MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष चौदावे / अंक ६ / जून २०१३

## संपादकीय

### डोके चालू शकणार नाही असा 'सामान्य' नागरिक

गेल्या एक दोन महिन्यांतील देशामध्ये घडणाऱ्या घटना पाहिल्या, की महाभारतातील अभिमन्यूची आठवण होते. चक्रव्यूहात शिरायचे ज्ञान त्याला होते, पण बाहेर पडायचे नव्हते. आपल्या देशाचे असेच झाले आहे. त्यामुळे साठ, पासष्ट वर्षे होऊन गेली तरी देशाच्या सीमा रेषा आणि त्या सीमारेषांमध्ये राहणारे सामान्य नागरिक सुरक्षित नसावेत यापरते दुर्दैव ते कोणते?

सर्वच क्षेत्रांमध्ये जे काही चालले आहे ते पाहणाऱ्याला आसायलममध्ये टाकेल की काय अशी भीती वाटते. लोकशाहीमध्ये माध्यमे ही लोकशाहीचा चौथा खांब मानली जातात. त्यांतील इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा प्रभाव इतका आहे की पूर्वी 'छापून आलेले खरे', असे मानणारा नागरिक आता 'टी.व्ही.वर दाखवलेले खरे', असे मानू लागला आहे. या इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून देशात आज जे काही चालले आहे ते पाहता अंगावर काटा येतो. या प्रश्नांची आणि दुःखांची यादी करायची व त्यांचा समाजशास्त्रीय मागोवा घ्यायचा तर एखाद्या अभ्यासू समाज शास्त्रज्ञाला कसून संशोधन करावे लागेल.

अनधिकृतरीत्या बांधलेल्या व पडून सामान्य माणसाला चिरडणाऱ्या इमारती, इमारतींवर पडणारा हातोडा, 'आदर्श' ठरणारा घोटाळा, वारंवार होणारे लहान मोठे अपघात आणि त्यांत मरणारी माणसे; यासर्व घटना प्रदूषित वातावरणात सामान्य माणसाला अधिकाधिक असुरक्षित करतात. ही माध्यमे अशा एखाद्या मुद्यावर 'रोखठोक' वातानुकुलित चर्चा घडवून आणतात. 'जनमताचा कौल' घेतात पण या सर्वांचे नंतर काय होते, हे त्या भगवंतालाच माहीत. अशा हादरवून टाकणाऱ्या घटना घडल्या की मुख्यमंत्र्यापासून ते तथाकथित मोठ्या म्हणवल्या जाणाऱ्या माणसांपर्यंत सर्वजण अकलेचे तारे तोडतात आणि त्यामुळे 'सेलीब्रेटी' नावाची जमात सगळीकडे मिरवत रहाते.

दोन तीन दिवसात हे प्रश्न मागे पडले की दुसरेच प्रश्न समोर येतात आणि 'ताज्या बातम्या' म्हणून ही माध्यमे वारंवार दाखवत रहातात. बातम्यांच्या या वाहिन्या आणि देशातील वास्तवाची दाहकता आपल्याला जाणवत रहाते. सामान्य नागरिक म्हणून आपण किती हतबल आहोत याची जाणीव होत रहाते. एकीकडे भयाण दुष्काळाच्या बातम्या, गावागावांमध्ये थेंबभर पाण्याची वानवा; तर दुसरीकडे 'आयपीएल' नावाच्या तमाशासाठी लागणारी मैदाने हजारो लीटर पाणी ओतून

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

ओली केली जातात. आता तर हे सगळेच आयपीएल प्रकरण अतिदक्षता विभागात असल्याचे बोलले जाते. बारा महिन्यांतील तेरा महिने केवळ क्रिकेट खेळणाऱ्या आणि पैशांसाठी वाटेल ते करणाऱ्या यासर्व संबंधितांना खरे तर फाशीच द्यायला हवी. धर्म, नीती, परंपरा, संस्कार अशा सर्व संकल्पना कालबाह्य ठरल्या आहेत. डोक्यावर पैसा नावाचे भूत सगळीकडेच नाचताना दिसत आहे.

सरकारी नोकर म्हणजे जनतेची सेवा करणारे प्रशासकीय अधिकारी; पण मंत्र्यांशी साटेलोटं करून इतका पैसा जमा केला जातो, की सामान्य माणसाला तो मोजताही येणार नाही. सार्वजनिक बांधकाम विभागातील या संदर्भातील 'सुरस कहाणी' लोकांनी दूरदर्शनवर डोळे भरून पाहिली. एखादा राष्ट्रीय पुरुष असावा आणि तो कर्तृत्व गाजवण्यासाठी जणूकाही मंगळावर किंवा अन्य ठिकाणी जात असावा आणि त्याला निरोप देणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे अशा भावनेने संजय दत्त या नटामागे कोर्टाच्या किंवा जेलच्या आवारात होणारी गर्दी पाहिली की 'कीव करणे' म्हणजे काय हे लगेच समजू शकते. या देशावर राज्य राजकीय पक्षांपेक्षा गुंडांचेच आहे. न्याय व्यवस्था, न्यायालये संसद मंत्रिमंडळे निवडणुका असे सर्व विषय हे सातत्याने दिसत रहातात. या सर्व विषयांना व्यापून उरलेल्या बलात्कारांच्या बातम्यांनी तर हतबलता प्रचंड वाढवली आहे. लोकप्रतिनिधींची अनधिकृत बांधकामे काय वाटेल ते झाले तरी टिकून रहातात आणि आज रात्री काय जेवायचे याची भ्रांत असलेल्या सर्वसामान्यांच्या घरावर बुलडोझर फिरवणाऱ्या न्यायालयांच्या आदेशांचे गौडबंगाल उलगडत नाही. वास्तविक पंतप्रधानांपासून ते सरपंचापर्यंत जे लोकप्रतिनिधी निवडून येतात. त्यांनी जनतेचे प्रश्न सोडवणे अपेक्षित असते. जनतेला त्यांच्याबद्दल विश्वास वाटावयास हवा; या उलट कोळशाच्या खाणीचे घोटाळे, सिंचन घोटाळे. स्वतःच्या मुलाबाळांची वर्णी लावणारे मंत्री संत्री यांच्यांच चेहऱ्याचं प्रदर्शन चालत रहाते. हे लोक या देशाचे भवितव्य काय घडवणार?

या देशात सामान्य माणसाच्या जीवनात आनंद आणि सुख आलेच तर त्यांना 'संपण्याची मुदत' (एक्सपायरी डेट) आहे. पण दुःख वेदना लहान मोठे प्रश्न, ताणतणाव या गोष्टींना मात्र 'संपण्याची तारीख'(एक्सपायरी डेट) नाही. चक्रव्यूहातून बाहेर कसे पडायचे हे भगवंतानी सांगायला हवे होते. पण ते सांगितले गेले नाही आणि अभिमन्यू अडकत गेला. तसेच आजच्या सर्वसामान्य माणसाचे झाले आहे. या सर्वांवर येणारी वृत्तपत्रीय संपादकीये, लेख एकूण त्यांच्या भाषा दौर्बाल्यामुळे व रंगीबेरंगी जाहिरातींमुळे केवळ तोंडी लावणे झाले आहे. हा समाज बदलावा असे कोणालाही वाटत नाही आणि ज्याला वाटते असा सामान्य माणूस असुरक्षित वातावरणात हे सर्व हात चोळत पहात रहातो.

या घोटाळेबाजांचे वकील जे बोलतात ते अगम्य असते. त्यातून हे वकीलच सेलिब्रेटी होतात. जनहित याचिका, कायदे समित्या यांचे अस्तित्व तर डोके चालणारच नाही इतके विस्तारले आहे. कायदे करायचे, लगेच पळवाटा बनवायच्या आणि सर्व काही न्यायालयांच्या फेऱ्यांवर खर्च करायचे; इतकी फसवेगिरी, गुन्हेगारी आपल्या मातीत खोलवर गेली आहे. सदोष मनुष्य वधाचा गुन्हा केलेला, हरिणाची शिकार करणारा सुमार नट दूरदर्शनवर जाहिरातीतून चमकत राहतो. जनाची नाही तर मनाचीही लाज नसणारी ही मंडळी देशाचे वाटोळे करायला निघाली आहेत. ही दुर्दैवाची बाब आहे.

**– मोहन पाठक**

●●●

वर्ष चौदावे/अंक ६/जून २०१३

वर्ष चौदावे/अंक ६ /जून २०१३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १७ वे/अंक १२ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | धर्मशास्त्र का घटना ? | डॉ. विजय बेडेकर | ३ |
| ३) | गीता विश्व | श्रीमती आशा भिडे | ५ |
| ४) | श्रीमत् भगवद् गीता - अध्याय पाचवा<br>विषय : कर्म संन्यास योग | कै. शं. बा. मठ | ९ |
| ५) | भेट गॉंग्च्यू मधील नांगजियांग सुओला | डॉ. सुधाकर आगरकर | १२ |
| ६) | रामचरित मानस | प्राचार्य सी. श्री. मुजुमदार | १५ |
| ७) | श्री. माधव नामदेव पाटील<br>अविस्मरणीय आठवणी | श्री. वि. करंदीकर,<br>प्रा. दि. कृ. नायक<br>प्रा. सी. श्री. मुजुमदार | २० |
| ८) | अष्टविनायक दर्शन | श्री. चंद्रकांत शिंगाडे | २४ |
| ९) | साहित्य-जगत | श्री. शरद जोशी | २८ |
| १०) | काही भारतीय शास्त्रज्ञ | संकलित | ३४ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३६ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- ❖ दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- ❖ आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर
  कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२
  या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- ❖ www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# धर्मशास्त्र का घटना ?

*आमचे दिशाचे सन्माननीय संपादक डॉ. विजय बेडेकर हे सद्धर्मचेही संपादक आहेत. त्यांचे सद्धर्म एप्रिल १३ चे संपादकीय दिशाच्या वाचकांसाठी पुनर्मुद्रित करत आहोत. – कार्यकारी संपादक*

कुठल्याही सभ्यतेच्या व्यावहारिक आणि संतुलित जगण्याकरता नुसता 'ऐहिक' किंवा 'आध्यात्मिक' उत्कर्ष किंवा विचार पुरेसा नसतो. पाश्चात्त्य जगतातील खालडियन, बॅबिलोनियन, सुमेर, ग्रीक आणि रोमन या सगळ्या सभ्यतांमध्ये, वैयक्तिक आणि सामूहिक जीवनामध्ये निती नियमांची चौकट ही धर्म पालनातूनच घालून दिलेली दिसते. भारतामध्येही अगदी वैदिक काळापासून ते ईस्ट इंडिया कंपनीने १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात राज्यशकटाचा ताबा घेईपर्यंत अशी चौकट धर्मशास्त्राच्या माध्यमातून अस्तित्वात होती. पाश्चात्य आणि भारतीय संस्कृतीच्या अशा चौकटीच्या निर्मितीच्या तत्त्वज्ञानाचे आणि अंमलबजावण्याच्या पद्धती व स्त्रोत मात्र संपूर्णतः भिन्न आहेत. पाश्चात्त्य आणि भारतीयांची 'धर्म' संकल्पना ही यामुळेच संपूर्णतः वेगळ्या सिद्धांतावर आधारित आहे. भारतापुरते बोलायचे तर पा. वा. काण्यांचा ५ खंडांमध्ये विभागलेला धर्मशास्त्राचा इतिहास (१९६८-७५), डेरेट (१९६८), लिंगट (१९७३) आणि सरकार (१९५८) यांनी याविषयावर विपुल लिखाण केले आहे.

धर्मशास्त्रांच्या ग्रंथांमध्ये मनुस्मृती आणि सर्वच स्मृतिग्रंथ आणि त्यावरील टीका आणि निंबधांचा समावेश होतो. अर्थातच, मनुस्मृतीचे यातील अग्रस्थान व अधिकार हा पुढील सर्वच स्मृतींनी मान्य केला असल्यामुळे स्मृती म्हटले की मनुस्मृतीच डोळ्यासमोर येते. मनुस्मृती ही १२ अध्यायांची असून त्याच्या सुमारे २७०० श्लोकांमधून तत्कालीन समाजरचनेला आवश्यक असणाऱ्या सगळ्या गोष्टींचा त्यामध्ये ऊहापोह केला आहे.

समाज हा अनेक व्यक्ती आणि व्यक्ती-समूहांच्या गटांनी बनलेला असतो. यामध्ये स्त्री-पुरुष हा भेद असतोच पण जन्मापासून म्हातारपणापर्यंतच्या वयोगटामधे विभागला गेलेला मोठा वर्गही त्यामध्ये असतो. प्रत्येकाचा वयोगट आणि व्यवसाय यावर आधारितच त्याचे इतर व्यक्ती किंवा समूहांशी संवाद होत असतात. म्हणूनच एकाच व्यक्तीच्या या वेगवेगळ्या टप्प्यावरील जबाबदारी व भूमिका भिन्न असतात. जीवनाच्या या एवढ्या मोठ्या व्यापकतेला सर्वच घटकांना न्याय देऊन त्यामध्ये संतुलन राहील असे पर्याय देणे, हे काम सोपे नाही. मनुस्मृतीने ते आचार, संस्कार, प्रायश्चित आणि व्यवहार या पदरांतून केले. यातला शेवटचा पदर 'व्यवहार', म्हणजे आजचा कायदा. आधीचे ३ पदर माणसाला सु-शिक्षित आणि सुसंस्कारित करतात. चारित्र्यशील नागरिक बनवण्याचा तो अभ्यासक्रमच आहे. राजापासून ते सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय नेतृत्व हे अशाच चारित्र्यवान लोकांच्या हातात रहाण्याची यात तरतूद आहे. अशा मूल्यांचा आदर करणाऱ्या चारित्र्यशील समाजामध्येच व्यवहाराचे म्हणजे कायद्याचे पालन होऊ शकते. फक्त कायद्यामुळे 'चारित्र्यशील' व्यक्ती किंवा 'समाज' निर्माण होत नसतो.

भारतीय धर्मशास्त्रामधे राजकारण, अर्थशास्त्र आणि अर्थव्यवस्था तसेच नीतिशास्त्राचाही समावेश आहे. आपल्या संस्कृतीत धर्म हा शब्द कर्तव्यवाचक आहे. म्हणूनच धर्मशास्त्रामधे व्यक्तीच्या अधिकारापेक्षा कर्तव्याला प्राधान्य आहे. कुटुंबप्रमुखाने कुटुंबाचे आणि

राजाने प्रजेचे संरक्षण आणि पालन करणे हा त्यांच्या कर्तव्याचा भाग आहे. कर्ज घेतल्यावर ते परत करणे हा कर्तव्याचाच भाग आहे. कुठल्याही कारणास्तव ते परत न करणे, हे म्हणूनच समाजमान्य नाही. कायद्यापेक्षा तो धर्म प्रवृत्तीचा एक भाग आहे. पाश्चात्त्य आणि भारतीय धर्मसंकल्पनेतील हा फरक लक्षात घेतल्याशिवाय पाश्चात्त्य संस्कृतीचे आंधळे अनुकरण करुन आपण काय गमावले हे लक्षात येणार नाही.

या पार्श्वभूमीवर सध्या घडणाऱ्या काही घटनांचा आढावा घेणे योग्य ठरेल. संजय दत्तच्या गुन्ह्याची माफी, लोकप्रतिनिधींनी विधानसभेच्या आवारात पोलीसाला केलेली मारहाण, लोकसभा, विधानसभेपासून ग्रामपंचायतीपर्यंत सर्वच पक्षांनी गुन्हेगारांना दिलेले प्रतिनिधित्व आणि सर्वच स्तरावरील भ्रष्टाचार आणि बलात्काराच्या या अगणित घटनांचे मूल्यमापन करायला शब्दकोशांत शब्द नाहीत. न्यायालयात लाखोंनी खटले प्रलंबित आहेत आणि दररोज शेकडोंनी त्यामध्ये भर पडत आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेत नुकत्याच मांडल्या गेलेल्या हक्कभंगाच्या ठरावामुळे हे स्पष्ट आहे की घटनेनुसार सर्वांना एकच न्याय लागू नाही. कायद्यापुढे आपण सर्व समान हा भ्रम यामुळे दूर झाला.

मनुस्मृती ही कुठल्याही राजांनी किंवा समाजांनी लादलेली व्यवस्था नव्हती. गेल्या २००० वर्षात भारताच्या वेगवेगळ्या प्रांतात याज्ञवल्कीय, पराशर, कात्यायन, नारद अशा अनेक स्मृती, त्यांच्यावरील टीका आणि निबंध भारतीय समाजाला मार्गदर्शन करीत होते. आपण मनुस्मृती जाळली आणि स्वातंत्र्यानंतर लगेचच नवीन घटनेचा स्वीकार केला. ही घटना म्हणजे ब्रिटिशांनी स्वातंत्र्यपूर्व काळात तयार केलेल्या कलमांची भ्रष्ट नक्कल आहे. या घटनेतील २/३ भाग हा कानामात्रेचा फरक न करता तशाचा तसा उचलेला आहे. गेल्या ६५ वर्षांत आपल्या घटनेत आपण १०० हून अधिकवेळा बदल केले. या देशांत आज स्त्रियाच काय, पण कोणीही सुरक्षित नाही. घटनेप्रमाणे सर्व समान, पण शाळेपासून नोकरीपर्यंत सर्व वाटप हे जातीवर आधारित!! या देशातील प्रत्येक घटक हा आपण किती मागासलेले आहोत हे आग्रहाने सांगण्यात धन्यता मानताना दिसतो. पाश्चात्यांचे अनुकरणच असल्यामुळे अधिकारांचा अतिसार आणि कर्तव्याचे बद्धकोष्ठ झाल्याचे दिसते. बॉंबस्फोटासारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नालाही निकाल मिळायला २० वर्ष लागतात, तर इतरांची काय कथा? निधर्मी राज्यामध्ये अल्पसंख्यकांच्या अधिकारांचे राजकारण हे कुठल्या तर्कामधें किंवा समानतेच्या तत्त्वात बसणारे आहे? राजेशाही, सरंजामशाही नको म्हणून आपण लोकशाहीचा स्वीकार केला. पण दिल्लीपासून गल्लीपर्यंत चालू आहे ती घराणेशाही !!

आजचा आपला समाज हा राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक आघाड्यांवर नेतृत्वहीन आहे. आपल्या धर्ममार्तंड्यांची परिस्थिति तर केविलवाणी आहे. या भयावह परिस्थितीवर उपाय एकच आहे. तो म्हणजे विचारांचे भारतीयकरण करणे. म्हणजेच, अधिकारापेक्षा कर्तव्याला प्राधान्य देणे.

**– डॉ. विजय बेडेकर**
संपादक – व्ही. पी. एम्. दिशा,
संपादक– सद्धर्म,
कार्याध्यक्ष – विद्या प्रसारक मंडळ,
अध्यक्ष – प्राच्च्य विद्या अभ्यास संस्था

●●●

# गीता विश्व

*गीतेवरील एका ग्रंथाचा हा करुन दिलेला परिचय – संपादक*

माझ्याजवळ 'सार्थ ज्ञानेश्वरीची' १९८० सालची सातवी आवृत्ती आहे. या ग्रंथाची पहिली आवृत्ती शके १८७५ मध्ये (१९५३ साली) निघाली होती. त्यावेळी य. ग. जोशी यांच्या प्रसाद प्रकाशनने त्यांचे संपादन केले व त्यानंतर २,३,४, आवृत्त्या त्यांनीच काढल्या. त्यानंतर ५,६,७ आवृत्तीचे काम स्वानंद प्रकाशनने केले.

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ अलौकिक, जगत्मान्य ग्रंथ आहे. तो तेराव्या शतकाच्या आरंभी झालेला आहे. ज्ञानेश्वरांनी पैठणहून येतांना 'नेवासे' येथे प्रवरेच्याकाठी भगवान शंकराच्या मंदिरात १२१२ मध्ये भगवद् भक्तांसमोर गीतेवरील टीका 'ज्ञानेश्वरी' सांगितली. ती नेवासे येथील कुलकर्णी सच्चिदानंद बाबांनी लिहून घेतली.

शके बाराशते बारोत्तरें। तैं टीका केली ज्ञानेश्वरें। सच्चिदानंद बाबा आदरे। लेखकु झाला।। . ८.१८१०

ज्ञानेश्वरीचा रचनाकाळ स्वराज्याचा, यादवांच्या राज्याचा होता. मुस्लीम होते, पण ते महाराष्ट्रात नव्हते. म्लेंछ, बौद्ध, जैन महानुभाव यांचा उल्लेख ज्ञानेश्वरीत आहे.

वैदिक धर्माची रक्षा करण्याकरिता त्यांनी परधर्मीयांवर हवा तसा हल्ला चढवून नव्हे, तर हव्या तशा उदारपणे उदार अध्यात्म सांगणारा गीता ग्रंथ टीका करण्यास हाती घेऊन व त्यातील गीतार्थाने विश्वभरुन जगाला तारणारा वैदिक धर्मच आहे असा दृढ विश्वास संपादन केला. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ पहिल्या पानापासून बघावा, वाचावा मनन करावा ग्रंथ उघडताच आतमध्ये श्रीक्षेत्र नेवासे येथील श्री शंकराचे मंदिरातील ज्या खाबांजवळ बसून श्री ज्ञानेश्वरांनी सांगितली त्या खांबाचे कृष्ण धवल छायाचित्र आहे. त्यानंतर थोडा पूर्व इतिहास आहे. ज्ञानेश्वरी संशोधनकार पैठणकर श्री एकनाथांना ज्ञानेश्वरांनी स्वप्नात येऊन माझ्या कंठाला मुळी लागलेली आहे ती तू काढ म्हणजे माझी ज्ञानेश्वरीची मूळ शुद्ध प्रत अशुद्ध झाली आहे ती तू पुन्हा शुद्ध स्वरूपात तयार कर म्हणून सांगितले. (शके १५०६ मधे) त्याप्रमाणे नाथांनी प्रत तयार केली. नाथपूर्वकालीन राजवाड्यांची म्हणूनही प्रत प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत आवृत्तीकरिता घेतलेली प्रत नाथांच्या नंतर साठ वर्षांनी असल्याने व ती त्यापूर्वी तीस वर्षे लिहिलेल्या नाथगृही विद्यामन असलेल्या पोथीशी तुलना करून छापलेली असल्याने हल्ली कुंटे, साखरे, ढवळे वगैरे प्रचलित पोथ्यांतील श्लोक व ओव्या यांचा अनुक्रम नाथकाळी नव्हता. नंतर साठ वर्षेही नव्हता. नंतर अर्थाच्या दृष्टीने सुसंगत क्रम तयार केला गेला व तोच पुढे चालत आला. प्रस्तुत प्रत शब्द लिखाणाची पद्धत सोडून मूळ प्रतीबरहुकुम छापली आहे. कठीण शब्दांच्या कोशातसुद्धा बऱ्याच नवीन शब्दांची भर घालून कोश विस्तृत केला आहे. ओव्यांचा अर्थ पाठाप्रमाणे फरक करुन दिला आहे. १. प्रत्येक अध्यायाच्या आरंभी अध्यायातील ओव्यांचा सारांश दिला आहे. कोणत्या ओवीपासून कोणत्या ओवीपर्यंत कोणता विषय आहे ते दाखवणारे ओव्यांचे आकडेही दिले आहेत. २. या प्रतीत मूळातले संदर्भ शोधून मुळातील कथा दिल्या आहेत. ३. ज्ञानेश्वरीतील विषयांची सूची दिली आहे. ४. त्याशिवाय ज्ञानेश्वरीशी संबद्ध अशा वेगवेगळ्या विषयांची चर्चा करणारी प्रदीर्घ प्रस्तावना (हे

या प्रतीचे खास वैशिष्ट्य आहे) अथवा उपोद्घात यात दिला आहे.

सकल जन सर्व सुखांनी परिपूर्ण होऊन त्यांनी भगवंताची सेवा अखंडित करावी, अशी ज्ञानेश्वरी लिहिण्यामागे ज्ञानेश्वरांची मनीषा होती. गुरुवर्य कै. सोनोपंत दांडेकर यांनी त्यासाठी आपला देह चंदनाप्रमाणे झिजवला. असे रामराज्य प्रत्यक्षात जेव्हा अवतरेल तेव्हाच सोन्याचा दिवस उजाडेल. आचार्य अत्रे म्हणत, 'मराठी साहित्यात कै. राजवाड्यांच्या ज्ञानेश्वरीनंतर दांडेकरांच्याच ज्ञानेश्वरीचे नाव घेतले जाते. म्हणून १९५९ च्या आषाढी एकादशीच्या दिवशी ही आवृत्ती प्रसिद्ध करून त्यांनी ज्ञानेश्वरीच्या भक्तांवर व अभ्यासकांवर प्रचंड ऋण करून ठेवले आहे. सार्थ ज्ञानेश्वरीत त्यांची १४५ पृष्ठांची प्रदीर्घ प्रस्तावना मार्मिक नि स्फूर्तिदायक उपयुक्त आणि सुबोध आहे.

ज्ञानराज माझी योग्यांची माऊली ।
जेणे नियमवाली प्रकट केली ।।१ ।।
गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी ।
ब्रह्मानंद लहरी प्रगट केली ।।२ ।।
अध्यात्म विद्योचे दाविलेसे रूप ।
चैतन्याचा दीप उजळिला ।।३ ।।
छप्पन भाषेचा केलासे गौरव।
भवार्णवी नाव उभारिली ।।४ ।।
श्रवणाचे मिषें बैसावे येऊनी ।
साम्राज्य भुवनीं सुखी नांदे ।।५ ।।
नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी ।
एक तरी ओवी अनुभवावी ।।६ ।।

एके काळी ज्ञानदेवांच्या कार्याचे मूल्यमापन असे केले जात असे की त्यांनी संस्कृतात असलेले अध्यात्म व तत्त्वज्ञान (म्हणजे जगद्गुरु शंकराचार्यांचे संस्कृतातील 'गीताभाष्य') मराठीत आणले. ज्ञानेश्वरी हा प्राकृत ग्रंथ बायाबापड्यांसाठी व पंचदशी, भामती वगैरे ग्रंथ हे पंडितासाठी! पण नंतर कै. जोग महाराजांनी सिद्ध केले की ज्ञानेश्वरी म्हणजे 'गीताभाष्याचे' मराठी रूपांतर नव्हे. त्यांनी दुसऱ्याही आचार्यांचे ग्रंथ अवलोकिले होते. (भाष्यकाराते वाट पुसतु) त्यांना स्वतंत्र प्रज्ञा होती. डॉ. शं. दा. पेंडसे यातील भाष्यकार म्हणजे शंकराचार्यच. ते आचार्यांचे अंध अनुयायी नव्हते. त्यांनी अनेक भाष्यकारांना वाट पुसली नाही. शांकरभाष्य व रामानुज भाष्य यांपैकी त्यांनी शांकरभाष्याचाच मागोवा घेतला. पण 'गुरुकृपे काय नोहे । ज्ञानदेवो म्हणे । याकारणे मियां । श्री गीतार्थ मऱ्हाठिया । केला लोकां ययां । दिठीचा विषो । गुरुकृपा माझ्यावर आहे म्हणून मी संस्कृतातील गीतार्थ सोपा करून मराठीत (ओवीबद्ध ग्रंथ) आणला. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ पांडित्य प्रदर्शनासाठी नाही तर सर्वांना परमानंदाची प्राप्ती करुन देण्यासाठी ज्ञानेश्वरी लिहिली असे ते स्वतःच सांगतात. जगाचे अज्ञान दूर करण्यासाठी त्यांनी ब्रह्मज्ञानाची पाणपोई चोहट्यावर सर्वांसाठी आणून खुली केली. 'तैसा वाग्विलास विस्तारू । गीतार्थेसी विश्वभरू । आनंदाचे आवारू । मांडू जगा ।।

संस्कृतातील गीता ज्ञानदेवांनी मराठीत आणून आबाल सुबोध केली ती आपल्या संस्कृत प्रचुर पांडित्याने मामासाहेबांनी पुन्हा ती अवघड व बोजड न करता ती सोपीच ठेवली. हे त्यांच्या सार्थ ज्ञानेश्वरीवरून कळते. मामासाहेबांचे सोनोपंत नाव सार्थ होते. ते परिसासारखे होते. ते तत्त्वज्ञानाचे आधी प्राध्यापक व नंतर प्राचार्य होते. अमानित्व, अनासक्ती व निरपेक्षत्व हे त्याचे विशेष गुण होते. साध्या शुभ्र पांढऱ्या पोशाखातील ते संन्याशीच होते. त्यांच्या दर्शनाने प्रसन्न वाटे. ते ज्याला स्पर्श करीत त्याचे सोने होई. शुद्ध सोन्याच्या पात्रात गंगोदक असावे त्याप्रमाणे विमल ज्ञानाला सदाचार व गुरुभक्तीची जोड होती. समाजाची बौद्धिक पातळी उंचावण्याचे महान कार्य केले.

दरिद्री नारायणास देणे ही खरी भूतदया; इतर देणे कर्ज देण्याप्रमाणे आहे.

मामासाहेब ज्ञानेश्वरी जगले. तथा मंडळ व येरवडा तुरुंगात त्यांनी प्रवचने केली. दिवसा प्राध्यापकी व रात्री ज्ञानेश्वरीवर कीर्तन प्रवचन करीत. दर कार्तिकी एकादशीला आळंदीस त्याचे कीर्तन असे. १९५२ ला निवृत्त झाल्यावर नागपूर ते बेळगाव 'हाती टाळ दिंडी मुखी नाम गाणे' हे कार्य त्यांनी मृत्यू (१९६८) पर्यंत केले. त्यांचे जीवन आदर्शवत होते. जोग महाराजांचे ते शिष्य होते. गुरुदेव रा. द. रानडे हे संत त्यांचे प्रोफेसर होते. सोनोपंत शिक्षण प्रसारक मंडळीत अल्प वेतनावर आजीव सेवक होते. ही सेवाभावी संस्था होती. पौर्वात्य व पाश्चत्त्य तत्त्वज्ञानाचे ते गाढे अभ्यासक व अनुभवी होते. ते शिस्तप्रिय, वक्तशीर कर्तव्यदक्ष, चारित्र संपन्न निष्णात शिक्षक म्हणून विद्यार्थीप्रिय होते. मामासाहेब म्हणजे चालती बोलती ज्ञानेश्वरी होते. ते नैष्ठिक ब्रह्मचारी होते. पण त्यांनी मठ व शिष्यपरंपरा चालवली नाही. सामान्य साधकाप्रमाणे आचारण होते पण कोणाला ब्रह्मचारी रहा म्हणत नसत. त्यांनी जोग महारांचे चरित्र, वारकरी, संप्रदायाचा इतिहास, ईश्वर वाद ही पुस्तके व बरेच अध्यात्मिक लेख 'प्रसाद' मासिकातून लिहिले. ते त्यांनी प्रवचन, कीर्तनाची दिडकी कधी घेतली नाही. द्रव्य घेणारे व देणारे नरकात जातात असे त्यांचे मत होते.

सोनोपंत दांडेकरांच्या निधनानंतरही दहा दहा हजारांच्या ७-८ आवृत्या निघाल्या हे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या दीर्घकालीन तपश्चर्येचे व विशुद्ध आचरणाचे फळ आहे. ज्ञानेश्वरीची ५-६-७ ही स्वानंद प्रकाशने काढली. मामासाहेबांच्या निधनंतर ही ज्ञानेश्वरांची व मामासाहेबांची अमूल्य सेवाच घडली असे प्रकाशक म्हणतात. दिसावयास टीकात्मक पण खरोखरच हा स्वतंत्र असा ग्रंथ आहे. तेराव्या शतकारंभी लिहिलेला हा ग्रंथ आज २१ व्या शतकातही अभ्यासनीय व वंदनी आहे व जगाच्या अंतापर्यंत रहाणार आहे. ' आत्मसाक्षात्कार' हाच ज्ञानेश्वरांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा गाभा होता. 'दिसते परतत्त्व डोळा। पाहो सुखाचा सोहळा। रिघो महाबांध संकाळा। माजिविश्व ।। १३.११६१ मऱ्हाटिचिये चोहट्यावर अध्यात्मज्ञानाचे अन्नछत्र त्यांनी उघडले होते. कोणीही श्रद्धेने भक्तीभावाने येऊन प्रसाद घ्यावा. इये मऱ्हाटिचिये नगरी। ब्रह्मविद्येचा सुकाळू करी। वैदिक धर्माचे तत्त्वज्ञान सांगणारी भगवद्गीता प्राकृत भाषेत सांगून त्यांनी ब्रह्मविद्योचा खजिना बहुजन समाजासाठी खुला केला. गीतेचा अक्षयानंदाचा संदेश जगाच्या कानाकोपऱ्यात पोचवून त्यांनी जगाला कृतार्थ केले. जनता सर्व सुखांनी परिपूर्ण होऊन त्यांनी भगवंताची सेवा अखंडित करावी अशी ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी लिहिण्यामागे मनीषा होती. मामासाहेबांनीही त्यासाठीच आपला देह झिजवला. असे रामराज्य प्रत्यक्षात येईल तो सोन्याचा दिवस ईश्वरनिष्ठ संतांना यापेक्षा काय हवे हो!

**सार्थ ज्ञानेश्वरीत -**

- मामासाहेबांची प्रस्तावना-(१४५ पाने) यात विषयानुक्रममध्ये यात काय काय भाग आहे तो सविस्तर दिलाय. त्यानंतर
- गीताध्यान व ज्ञानेश्वरीचे पारायण करण्याची पद्धती
- सार्थ ज्ञानेश्वरीचे (भगवद्गीतेसह)
- पौराणिक कथानके व गीतेतील श्लोकांची वर्णानुक्रमणिका
- ज्ञानेश्वरीतील ओव्यांची वर्णानुक्रमणिका
- कठीण शब्दांचा कोश
- ज्ञानेश्वरीतील विषयसूची

असे या 'सार्थ ज्ञानेश्वरी' ग्रंथाचे स्वरूप आहे, या ग्रंथाची पृष्ठे ११८० आहेत. पाचवी आवृत्ती - ३८ रु., ६ वी - ३६ रु., ७ वी - ६० रु. सुरुवातीस सवलत योजनेत २४ रु. दिली. 'ज्ञानेश्वरी' ज्ञानेश्ववरी प्रेमी भक्तांना, अभ्यासकांना कमीत कमी किंमतीत मिळावी म्हणून या

शाळा बदलल्याने इयत्ता बदलत नाही.

ग्रंथावर प्रकाशकाने व्यापार केला नाही. वारकरी शिक्षण संस्थेने इतर प्रकाशनांच्या मानाने किंमत कमी ठेवण्याचे धोरण स्वीकारले. यावरून मामासाहेबांच्या 'सार्थ ज्ञानेश्वरीचे' किती महत्त्व आहे हे यावरून परत एकदा सिद्ध होते असे वारकरी शिक्षण संस्था, देवाची आळंदीचे अध्यक्ष शं. मो. बापट यांनी म्हटले आहे.

या ग्रंथ प्रकाशनाच्या रूपाने ज्ञानेश्वर माऊलींची व गुरुवर्य मामासाहेबांची अमूल्य सेवा करण्याचे भाग्य आम्हांला लाभले आहे असे स्वानंद प्रकाशनचे प्रकाशक म्हणतात.

'नामा म्हणे श्रेष्ठ ग्रंथ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी।।'

ज्ञानेश्वरी स्वतः वाचून अभ्यासल्याशिवाय त्यातील काव्यसौंदर्य, ज्ञानेश्वरांची प्रतिभा, प्रत्ययाला येणार नाही. 'ज्ञानेश्वरी' हा मराठी सारस्वतातील 'काव्यराज' असा ग्रंथ आहे.

गीता हा ग्रंथ उच्च प्रकारचे जीवन कसे जगावे याची प्रामुख्याने चर्चा, इतर विषय अनुषंगिक ती नुसती प्रासंगिक उपदेशाच्या दृष्टीने नव्हे तर मानवी जीवनात जी काही शाश्वत मूल्ये आहेत त्यांचा वस्तुनिष्ठ विचार ज्यात आहे असे एक जीवनशास्त्र आहे. अर्जुन अशा अखंडानंदाच्या साम्राज्याचा धनी झाला. 'म्हणोनि मने काया वाचा। जो सेवक होईल इयेचा। तो स्वानंद साम्राज्याचा। चक्रवर्ती करी।।१८.१६७

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
मोबाईल - ९३२४०४४७६४

●●●

*वैश्विक विज्ञानाचा मूलस्त्रोत*
*प्राचीन भारतीय विज्ञान*

**विविध संस्कृतींमधील विज्ञान विकासाचे चढउतारः**

ख्रिस्तपूर्व ६०० ते ५०० हा काळ पृथ्वीवरील अनेक देशांमध्ये महत्त्वाचा ठरला. नाईल, युफ्रेटिस, ओहियो यांसारख्या नद्यांच्या काठांवरच्या साम्राज्यांनी नवे विचार स्वीकारण्याचे धोरण अंगीकारले. परंतु हा बदल त्याच्या पुरताच मर्यादित होता. त्यावेळी आजच्यासारखी ज्ञानप्रसारमाध्यमे नव्हती. येथपर्यंत विज्ञानधिष्ठित चिंतन धार्मिक पगड्यापासून दूर होतं. परंतु या नंतरचा काळ धार्मिक वर्चस्वाचा होऊ लागला. त्यामुळे विज्ञान विकासाची वाट खुंटली. त्याबरोबरच तत्कालीन समृद्ध साम्राज्यांवर असंस्कृत किंवा अर्धसंस्कृत भटक्या टोळ्या जमातींनी या साम्राज्यांचे लचके तोडायला सुरुवात केली, आक्रमणे करून स्वतः स्थिरस्थावर व्हाचा प्रयत्न केला. सुसंस्कृतीबरोबर येणारी शांतताप्रिय जीवन जगण्याची दुबळी वृत्ती समृद्ध साम्राज्यांना अडचणींची ठरली, त्यांच्या पराभवाचं कारण ठरली, अशाच संस्कृतींमध्ये भारतीय सनातन संस्कृतीचा समावेश होतो. या आक्रमणांमध्ये रानटी वृत्तीचं वर्चस्व होतं. त्यामुळे तत्कालीन विद्यापीठांचा, संदर्भ साहित्याचा, वैभवदर्शक वास्तूंचा, मंदिरांचा प्रचंड नाश झाला आणि इतिहासाची साधनंही नष्टप्राय झाली. या आक्रमणांमुळे चिंतन व विज्ञान प्रयोगामध्ये खंड पडणे स्वाभाविकच ठरलं.

**डॉ. क. कृ. क्षीरसागर**
संदर्भ - शिवमुद्रांकन, नोव्हेंबर १२, पृ.१३

# श्रीमत् भगवद् गीता - अध्याय पाचवा
## विषय : कर्म संन्यास योग

*कै. शंकरराव मठांच्या गीतेवरील लेख मालेतील पाचवा लेख - संपादक*

**श्लोक १ ते ६ सांख्य योग व निष्काम कर्म योग निर्णय**

अर्जुन विचारतो-हे कृष्णा एकदा कर्म संन्यासाची तर दुसऱ्यावेळी कर्मयोगाची प्रशंसा करतोस. या दोहोंपैकी कोणता मला श्रेयस्कर आहे तो निश्चितपणे सांग.

श्रीकृष्ण म्हणतो-कर्म संन्यास व कर्मयोग हे दोनही मनुष्याला कल्याणप्रदच आहेत. परंतु त्या दोहोंत कर्म संन्यास करण्यापेक्षा कर्म योग आचरण श्रेष्ठ आहे. जो माणूस कोणाचाही द्वेष करत नाही, कसलीही इच्छा करत नाही त्याला नित्य संन्यासी म्हणावे. जो द्वंद्वापासून दूर राहतो तो सुखैनैव बंधनातून मुक्त होतो. अज्ञ माणूस सांख्यमार्ग व योग मार्ग वेगवेगळे आहेत असे समजतो, पण ज्ञानी तसे मानत नाही. कारण या दोहोंपैकी कोणाचेही योग्य पद्धतीने आचरण केले तरी दोहोंना प्राप्त होणारे फळच मिळते म्हणून सांख्य व योग या दोनही गोष्टी एकच आहेत असे जाणतो तोच खरा जाणकार होय. आणखी हे अर्जुना, कर्म योगावाचून संन्यास हा दुःसाध्य आहे. मात्र कर्मयोगी लवकरच ब्रह्माला प्राप्त होतो.

**श्लोक ७ ते १२ सांख्य व निष्काम कर्म योग यांची लक्षणे**

जो योगाचे आचरण करतो, जो शुद्ध अंतःकरणाचा आहे, जो संयमी आहे, जो इंद्रियावर ताबा मिळवितो, जो आपला आत्मा हा सर्व भूतांचा आत्मा असे मानतो तो कर्म करुनही अलिप्त राहतो. योगयुक्त तत्त्ववेत्ता पाहताना, ऐकताना, स्पर्श करताना, वास घेताना, खाताना, चालताना, निजताना, श्वास घेताना, सोडताना, बोलताना, विसर्जन करताना, घेताना, डोळ्यांच्या पापण्या उघड झाप करताना, केवळ इंद्रियेच आपआपल्या विषयात कर्म करत आहेत आणि मी काहीही करत नाही असे मानतो. जो फळाची इच्छा करत नाही. आपली कर्मे ब्रह्माला अर्पण करतो तो पाण्यातील कमळाप्रमाणे पापासून अलिप्त राहतो. कर्मयोगी आत्मशुद्धीसाठी शरीराने, मनाने, बुद्धीने, तसेच इंद्रियांकडूनही कोणती अपेक्षा न करता, कर्म करतो. हा कर्मयोगी फलाचा त्याग करून परमशांती प्राप्त करतो. परंतु जे कर्मयोगाचे आचरण करीत नाहीत ते कामनावशतेने फलाची इच्छा करतात व बंधनात पडतात.

**श्लोक १३ ते २६ ज्ञानयोग विषयक**

संयमी माणूस सर्व कर्मांचा मनाने संन्यास करून नऊ दारे असलेल्या देहात काही न करता व काही न करविता सुखाने राहतो. ईश्वर कोणाचेही कर्तृत्व, त्याची कर्मे व कर्म फळाचा संयोग निर्माण करीत नाही. स्वभावतः हे सारे घडते. सर्वव्यापी परमेश्वर कोणाचे पाप वा कोणाचे पुण्य घेत नाही. ज्ञानावर अज्ञानाचे पांघरूण पडले असल्याने माणसे मोहित होतात. ज्ञानाने ज्याचे ते अज्ञान नष्ट झाले त्याचे ते ज्ञान सूर्याप्रमाणे त्या परमश्रेष्ठत्वाला प्रकाशित करते. त्या परमात्म तत्वात ज्याची बुद्धी रमली, त्यातच ज्याचा आत्मा रंगला आणि त्यावरच ज्याची निष्ठा स्थिर झाली व त्यातच ज्याचे चित्त एकाग्र झाले त्याचे पाप या ज्ञानाने धुतले जाते व तो जन्म मरणाच्या फेऱ्यात अडकत नाही. ज्ञानी माणूस विद्येने युक्त ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा आणि चांडाळ या सर्वांना सम म्हणजे ब्रह्मरूप असे राहतो. ज्याचे मन या ब्रह्मभावात स्थिर झाले तो जणू काही या जीवनात जन्ममरणालाच जिंकतो. कारण ब्रह्म हेच सर्वत्र

सम आणि सदैव निर्दोष आहे; म्हणून तो ब्रह्मातच स्थित म्हणजे ब्रह्ममय होतो. जो प्रिय वस्तूच्या प्रप्तीने आनंदित होत नाही आणि अप्रिय वस्तू प्राप्त झाली असताना दुःखी होत नाही. तो स्थिर बुद्धीचा, कधीही मोहात न गुंतणारा ब्रह्मज्ञानीच होय. तो ब्रह्मात स्थिर झाला असेच म्हणावे. जो बाह्य विषय उपभोगात आसक्त होत नाही तो आपल्या आत्म्याच्या ठिकाणी अक्षय सुख मिळवितो. असे सुख ब्रह्मयोगात तत्पर असणाऱ्यालाच प्राप्त होते. कुंतीपुत्रा जे उत्तम स्पर्शाने मिळणारे भोग आहेत ते दुःखाचे कारण आहेत. ते उत्पन्न होऊन नष्ट होणारे असल्याने त्यात ज्ञानी रस घेत नाहीत. या जगात शरीराचा नाश होण्यापूर्वी काम क्रोधापासून उत्पन्न झालेला वेग सहन करावयास जो समर्थ होतो तोच सुखी होय. ज्याला आतूनच सुख प्राप्त होते, ज्याच्या अंतःकरणात शांति असते. ज्याला आतूनच प्रकाश प्राप्त झाला आहे तो योगी स्वतः ब्रह्मरूप बनतो व ब्रह्माची शांति मिळवितो. ज्याची सर्व पापे नष्ट झाली आहेत, ज्याचे सर्व संदेह दूर झाले आहेत. जो आत्मसंयमी आहे आणि जो सर्व प्राणि मात्रांच्या कल्याणासाठी झटत आहे तो अतींद्रिय दर्शन घेणारा ब्रह्माची शांति प्राप्त करतो. तो काम क्रोधांचा त्याग करतो. जो स्वतःचा संयम करतो व जो स्वतःला ओळखतो. त्याला सदैव ब्रह्मची शांति प्राप्त होते.

### श्लोक २७ ते २९ भक्तिसहित ध्यान योग

जो मुनि बाह्य विषय बाहेरच ठेवून दृष्टी भुवयांच्यामध्ये स्थिर ठेवतो आणि प्राण व अपान नाकातून संचार करीत असताही सम करतो, इंद्रिये मन आणि बुद्धी यांचे नियमन करतो, इच्छा भीति आणि क्रोध यापासून अलिप्त राहतो, मोक्षपरायण होतो तो सदैव मुक्त असतो. यज्ञ आणि तपाचरण करणारा, सर्व भूतमात्रांचे हित करणारा, सर्व लोकांचा महान् ईश्वर असे मला ओळखणारा असा मुनीं शंती प्राप्त करुन घेतो.

या अध्यायाचे नाव कर्म संन्यास असे आहे. आत्मा हा अभोक्ता, अकर्ता, निष्क्रिय आहे तत्त्वाची सिद्धता या अध्यायात केली आहे म्हणून या अध्यायाचे नाव वरीलप्रमाणे आहे. अर्जुनाला वाटले कर्म संन्यास श्रेयस्कर आहे तर त्याचे आचरण का करु नये? वारंवार कर्म कर असे श्रीकृष्ण का सांगत आहे. म्हणून तो विचारतो– कृष्णा तू एकदा कर्मसंन्यासाची आणि लगेच कर्म योगाची प्रशंसा करतोस. या दोहोंपैकी जो एक मार्ग मला कल्याणकारक होईल तो निश्चितपणे सांग. अशा प्रकारे अर्जुन आपल्या मनातील शंका व्यक्त करतो. श्रीकृष्ण त्याला निक्षून सांगतो. अर्जुना, दोन्ही मार्ग श्रेयस्कर आहेत. परंतु तुझ्या सारख्याला कर्म योग विशेष योग्य आहे.

### नित्य संन्यासी

जो कोणाचा द्वेष करत नाही, कोणत्याही फळाच्या प्राप्तीची इच्छा करीत नाही. जो द्वंद्वापासून दूर असतो, तो नित्य संन्यासी होय. याचाच अर्थ एकत्वाचा अनुभव घेणारा, सर्वांवर अखंड प्रेम करणारा आणि नित्य संतुष्ट असणारा हाच खरा संन्यासी होय. मग तो भगवी वस्त्रे परिधान करो वा न करो, असे म्हणण्याचे कारण केवळ बाह्य आचरण हे अपुरे आहे. मनाची धारणा वरीलप्रमाणे होणे हीच संन्यस्त वृत्ती आहे. कर्म करणे वा कर्म न करणे याचा संबंध गीतेच्या दृष्टीने या नित्य संन्यासाशी नाही. संन्यासाचा संबंध विशिष्ट मनोवृत्तीशी आहे. मनुष्याने नित्य संन्यासी होण्याचा प्रयत्न करावा.

### सांख्य व योग हे एकच

संन्यास मार्ग व कर्म मार्ग भिन्न नसून एकच आहेत. गीतेचे हे महत्वपूर्ण वचन आहे. संन्यास मार्गात कर्माचा त्याग, कर्म मार्गात कर्माचा अवलंब करणे आवश्यक. तथापि गीतेच्या म्हणण्याप्रमाणे हे दोन्ही मार्ग एकच आहेत. हे भिन्न आहेत असे मूढ लोक समजतात. गीता अशाला

बाळ (अज्ञानी) म्हणते. ज्ञानी लोक तसे मानीत नाहीत. कोणत्याही एका अनुष्ठानाने दोहोंचे फळ प्राप्त होते. जेथे सांख्य मार्गी जातात तेथेच कर्मयोगी जातात. याप्रमाणे दोन्ही मार्ग एकरूप आहेत. भिन्नत्व आचरण दृष्ट्या आहे. अंतिम सिद्धीच्या दृष्टीने नाही. कारण दोहोंना एकच स्थान प्राप्त होते. मात्र अर्जुना कर्म योगाच्या अभ्यासावाचून संन्यासाचा अभ्यास करणे अत्यंत दुःखदायक आहे. जो प्रथम योग साधन करून संन्यासाचे अनुष्ठान करतो तो लवकरच ब्रह्म प्राप्त करतो.

### निर्लेपता

इच्छा, द्वेष आणि द्वंद्व ही तीन बंधने आहेत. या बंधनांनी युक्त होऊन कर्म केले तर मनुष्याला कर्माचा लेप लागतो. अथवा पाप लागते. कर्माचा दोष नाहीसा करावयाचा झाल्यास इच्छा, द्वेष आणि द्वैतभाव दूर केला पाहिजे. कर्म योगी पवित्र, आत्मवान व इंद्रिय विजयी, सर्व भूतमात्रांना आपल्यासारखे मानणारा असल्याने कर्म करीत असूनही निर्दोष असतो. इंद्रियेच इंद्रियांच्या विषयात वर्तन करीत आहेत. अशा बुद्धीने तो वागत असल्याने कमळाचे पान पाण्यात अलिप्त असते तसा हा पापांसून अलिप्त असतो. सर्व भूतांची सेवा हीच परमात्म्याची सेवा आहे. कारण वस्तूमात्रच वासुदेव आहे. त्याची सर्व कर्मे या समर्पण भावनेने होतात.

### बंधनाची कारणे

जगाची सर्व बंधने, सर्व कष्ट, मानव जातीच्या संपूर्ण आपत्ती याचे कारण प्रत्येक व्यक्ती आपल्यासाठी आपल्या कर्म फळाचा संग्रह आपणाजवळ करीत असल्याने आहे. सर्व आपत्ती या फलासक्तीमुळे आहे. ज्यावेळी ही फलासक्ती दूर होईल आपल्या कर्माचे फल सर्वभूत मात्रासाठी दान करण्याचा सहज स्वभाव बनून जाईल त्यावेळी आपत्ती दूर होतील. या स्वभावाचे नाव संन्यास.

### तत्त्वज्ञानी पंडित

जो कर्तव्य आणि अकर्तव्य यथार्थपणे जाणतो तो तत्त्वज्ञानी पंडित होय. हा फलासक्ती सोडून कर्म करतो. ज्ञानी मोहरहित, पापरहित, समबुद्धी, तत्त्वज्ञानी असतात. ते कर्माचे फल आपल्यासाठी आपल्याजवळ राखून ठेवतात. जनता जनार्दनाला समर्पण करतात. मनुष्य आणि पशु या विषयीही समदृष्टी ठेवतात. सर्वत्र एक रस आत्मतत्त्व भरले आहे असे अनुभवाने जाणतात. ते शुद्धात्मे बंधनातून मुक्त होतात हेच खरे योगी होत.

### संयमाचे आचरण

या प्रकारच्या आचरणाला विशेष महत्त्व आहे. कारण या वाचून कर्मयोगाची सिद्धी होत नाही. मुनी हा मननशील व मौन धारण करणारा असतो. वशी-हा इंद्रिय विजय प्राप्त करुन घेतलेला असतो. निरिच्छतेमुळे इच्छा, वासना, कामना यावर आपोआप नियंत्रण राहते. हे नियंत्रण प्राप्त झाल्यानंतर तो उदिग्न होत नाही. काम क्रोधांचा वेग सहन करतो व त्याला कशापासून भीती निर्माण होत नाही.द्वैतभाव नाहीसा होतो आणि सर्वत्र समभाव निर्माण होतो. समबुद्धीलाच ब्रह्मबुद्धी असे म्हणतात. अशा रीतीने तो सर्व प्राणिमात्रांचा मित्र म्हणजे सखा होतो. सर्वांचा मित्र, हितकर्ता होतो. या अंतिम सिद्धीसाठी योग साधना आवश्यक आहे. याचा विचार गीतेने पुढील अध्यायात केलेला आहे. याचे अध्ययन, मनन, चिंतन करून स्वतःला मानवी पूर्णतेच्या अंतिम सिद्धीला प्राप्त करावे.

**कै. शं. बा. मठ**

●●●

आपले कर्तव्य कर्म कसूर न करता करत राहतो त्याला जगण्याचा कंटाळा येत नाही.

# भेट गॉंग्च्यू मधील नांगजियांग सुओला

*चीनच्या प्रवास वर्णनातील हा एक रोचक शैलीतील लेख - संपादक*

किशोरांसाठी आयोजित केलेल्या नवनिर्मिती स्पर्धेत भाग घेण्यासाठी आम्ही गॉंग्च्यू येथे गेलो होतो. आमच्या खेरीज आणखी ११ देशांतील स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आले होते. या ११ देशांतील पाहुण्यांना संयोजकांनी खास सुविधा पुरविल्या होत्या. स्पर्धेबरोबर शहराची आणि आजूबाजूच्या परिसराची माहिती पाहुण्यांना व्हावी यासाठी स्पर्धेतून सवड काढून सहल आयोजित करण्यात येते. स्पर्धेची सुरुवात सोमवारी व्हायची होती. रविवार हा तयारी करण्याचा आणि प्रकल्प लावण्याचा दिवस होता. हे काम लवकर आटपा, म्हणजे जेवणानंतर आपण शहरात फेरफटका मारून येऊ असे आम्हांला संयोजकांनी बजावले होते. त्यांच्या सूचनेनुसार आम्ही प्रदर्शनाच्या ठिकाणी सकाळी लवकर पोहोचलो आणि जेवणाची वेळ होण्याच्या आधी आपले काम आम्ही संपविले. ठरल्याप्रमाणे हॉटेलवर येऊन आम्ही दुपारचे जेवण आटोपले. त्यानंतर शहरातील नांगजियांग सुओ (Nangziyang Suo) या महत्त्वाच्या स्थळाला भेट देण्यासाठी निघालो.



जुने मंदिर आणि नवीन गगनचुंबी इमारत

हे ठिकाण शहराच्या मध्यभागी आहे. आजूबाजूला उंच उंच इमारती अलिकडच्या काळात उभ्या राहिलेल्या आहेत. आधुनिक इमारतींच्या मध्ये असलेली जुन्या पद्धतीची इमारत असे या प्रेक्षणीय स्थळाचे स्वरूप आहे. या स्थळाला भेट देण्यासाठी अनेक पर्यटक येत असतात. त्यामुळे तेथे गाड्या पार्क करण्यासाठी पुरेशी व्यवस्था आहे. आमची बस त्या ठिकाणी उभी ठेवून आम्ही नांगजिशाऊच्या प्रवेशद्वारापर्यंत चालत गेलो. जुन्या पद्धतीचे प्रवेशद्वार आपले स्वागत करते. या प्रवेशद्वारातून आत पाहिल्यास तीन इमारती, बगीचा आणि छोटेसे तळे आपल्या नजरेस पडते. प्रवेश शुल्क भरून आम्ही तिकीट घेतले आणि आत प्रवेश केला.



संस्थेचे प्रवेशद्वार

आत प्रवेश करताच मार्गदर्शक व्यक्तीने आम्हांला त्या स्थळाची माहिती दिली. त्याच्याकडून आम्हाला असे कळले की या ठिकाणापासून चीनी क्रांतीची सुरुवात झाली. १९ व्या शतकाच्या अंतापर्यंत चीनमध्ये साम्राज्यशाही अस्तित्वात होती. संपूर्ण देश लहानलहान

राज्यांमध्ये विभागला गेलेला होता. प्रत्येक राजाची राज्य करण्याची पद्धत वेगळी होती. बऱ्याचदा दोन राज्यांमध्ये युद्ध होत असत. सामान्य जनता हालअपेष्टा सोसत होती. देशाच्या अनेक भागांत आधुनिक प्रगतीचे वारेदेखील पोहोचले नव्हते. त्यामुळे सर्वसामान्य जनता असमाधानी होती. या असमाधनाला वाट करून देऊन एकसंघ समाजवादी चीन निर्माण करण्याचे कार्य विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात करण्यात आले. या कामाच्या अग्रस्थानी होते सनयात सेन. त्याने कामगार आणि शेतकरी यांना एकत्र आणून राज्यांविरुद्ध बंड पुकारले. या बंडाला यश मिळविण्यासाठी योजनेची पद्धतशीर आखणी करावी लागली. कामगार आणि शेतकरी यांच्या असंतोषाला फुंकर घालून त्यांना बंडासाठी तयार करायचे तर मोठ्या प्रमाणावर स्वयंसेवकांची गरज होती. हे स्वयंसेवक तयार करण्याचे काम या ठिकाणी केले जाई. त्यासाठी सनयात सेन स्वयंसेवकाचे प्रबोधन होत असत. माओत्सेतुंग आणि चौएनलाय हे दोन शिष्य त्यांना येथेच भेटले. त्यांनी आपल्या गुरूची शिकवण पुढे चालविली. अशा या ठिकाणाला भेट देऊन आम्हांला खूप माहिती मिळाली.



**प्रदर्शनातील पुतळे**

दोन बाजूला दोन लांबट इमारती आणि त्यांच्या मधोमध एक इमारत असे या प्रेक्षणीय स्थळाचे स्वरूप आहे. मध्यभागी लहानसे तळे निर्माण केलेले असून त्यात रंगीबेरंगी मासे वाढविले आहेत. कमळाच्या झाडांनी या तळ्याचे रूप खुलून दिसते. हे दृश्य बघत बघत आपण जेव्हा उजव्या बाजूकडून इमारतीत प्रवेश करतो तेव्हा एक सुंदर पुतळा आपल्या नजरेस पडतो. हा पुतळा सामान्य कामगाराचा असून क्रांतीचा प्रतिनिधी म्हणून त्याची तेथे प्रतिष्ठापना करण्यात आलेली आहे. देशभर पाठवायच्या स्वयंसेवकांचे तेथे प्रशिक्षण कसे केले जाई, त्यानंतर प्रत्यक्ष क्षेत्रात ते कसे काम करीत, बंडाला तोंड कोठे फुटले, राजाच्या सैन्याने कसा प्रतिकार केला आणि सरतेशेवटी त्यांचा पाडाव कसा झाला याची चित्ररूप माहिती येथे मिळते. याच प्रशिक्षणातून चौ एन लाय आणि माओ त्से तुंग हे कार्यकर्ते निर्माण झाले. त्यांचे तरुणपणाचे फोटो येथे पाहायला मिळतात. एखाद्या बंडाची आखणी आणि अंमलबजावणी कशी करावी याचे प्रत्यक्ष दिग्दर्शनच या चित्रातून आपल्याला मिळतो.



**चित्र प्रदर्शन**

समोरच्या लांबट इमारतीत आणखी असेच पोस्टर्स आहेत. तेथे रंगीत चित्रे ठेवलेली आहेत. ती अलिकडच्या काळात काढलेली आहेत. क्रांती यशस्वी होऊन समाजवादी राज्याची स्थापना झाली. राज्यकारभार हाती घेतल्यानंतर सनयात सेनने एकसंध देश कसा बांधला, कामगार आणि शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी कोणते उपाय योजले याची इत्थंभूत माहिती या प्रदर्शनातून आपल्याला मिळते. समाजवादी राजवट फारशी यशस्वी झाली नाही सुरुवातीच्या काळात चीनला इतर देशापासून वेगळे ठेवण्यात आले. १९८० च्या दशकात मात्र तेथील

राजकारण्यांना आपली चूक कळली. त्यानंतर त्यांनी विशेष औद्यागिक क्षेत्र स्थापन करून देशोदेशीच्या कारखानदारांना आपल्या देशात कारखाने काढण्यासाठी पाचारण केले. त्यानंतर देशाची वेगाने प्रगती झाली. या प्रगतीचे वर्णन करणारी काही चित्रे या प्रदर्शनात आहेत.

प्रेक्षणीय स्थळाच्या मध्यभागी जी इमारत आहे ती प्रामुख्याने सभागृहाची इमारत आहे. तेथे पुढारी आणि कार्यकर्ते यांच्या सभा होत असत. नवीन स्वयंसेवकांना प्रबोधन येथेच दिले जाई. या सभांचे स्वरूप कसे होते याचे चित्ररूप प्रदर्शन आपल्याला या इमारतीत पाहायला मिळते. इमारत जुन्या पद्धतीची असून चीनी देवळे ज्या पद्धतीने बांधली जातात त्याच पद्धतीने या इमारतीचे काम करण्यात आलेले आहे. बाहेरून ही इमारत अतिशय सुंदर दिसते. चीनी क्रांतीचे उगमस्थान म्हणून या ठिकाणाकडे पाहता येईल. चीनी राज्यकर्त्यांनी या स्थळाचे चांगले जतन केलेले आहे. विशेष म्हणजे त्या वेळच्या क्रांतीच्या जनकाची तत्त्वे त्यांनी पूर्णपणे सांभाळली नाहीत. गरजेप्रमाणे त्यांनी त्यात सुधारणा केली आणि बदल केले तरीही समाजवादाचा मूळ ढाचा त्यांनी बदललेला नाही.



**माहिती देण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग**

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, वैष्णव नगरी, काटई,
शीळ रोड, ता. कल्याण, जि. ठाणे

●●●

## चिनी कम्युनिस्ट क्रांती (इ. स. १९४९)

१. चिनी कम्युनिस्ट पक्षाची स्थापनाः १९२१, शांघाय येथे.

२. चिनी कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक : माओ त्से-तुंग.

३. १९२५ मध्ये डॉ. सन् येत्-सेन यांच्या मृत्यूनंतर कोमिंष्टांग व चिनी कम्युनिस्ट पक्ष यांच्यात यादवी युद्ध.

४. कोमिण्टांगबरोबरील संघर्षात क्वांगसी प्रांतात कोंडी झाल्यावर चिनी कम्युनिस्टांनी काढलेल्या 'लाँग मार्च' चा नेता : माओ त्से-तुंग.

५. दुसऱ्या महायुद्धात जपानचा पराभव झाल्यानंतर यादवी युद्ध अधिक तीव्र झाले आणि त्यात कोमिण्टांग शासनाचा पराभव. साम्यवादी क्रांतीनंतर 'चिनी लोकशाही प्रजासत्ताका'ची निर्मिती. (ऑक्टोबर, १९४९).

६. चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या 'एकपक्षीय हुकूमशाही' च्या चौकटीतील संविधानाची निर्मिती.

**– संग्रहातून**

●●●

# रामचरित मानस

*रामचरित मानस वरील लेख मालेतील हा पुढील लेख*

लग्नाची तयारी पाहून समाधान होत आहे. अर्थातच ज्या ठिकाणी स्वतः जगदंबाच वास करत आहे त्या ठिकाणाचे वर्णन केल्या जाऊच शकत नाही.

वरात नगराजवळ आल्यावर त्यांच्या स्वागतासाठी मुलीकडचे (म्हणजे हिमालयाकडचे) वऱ्हाडी सजून धजुन गेले. देवतांचा समाज बघून विष्णु फारच सुखी आणि समाधानी झाले. पण शिवजींचा समाज बघताच त्यांच्या वाहनाचे घोडे, बैल, हत्ती घाबरून पळायला लागले. थोडे मोठ्या वयाचे लोक धैर्याने तेथेच थांबले. पण लहान मुले तर प्राण एकवटून पळून गेली. घरी गेल्यावर आईवडिलांनी घाबरण्याचे कारण विचारताच थरथर कापत सांगतात.

कहिअ काह कहि जाइ न बाता। जम कर धार किधौ बरिआता।।
बरु बौराह बसह असवारा। व्याल कपाल विभूषन छारा।।

काय सांगायच काही सांगताच येत नाही. ही वरात आहे की यमराजची सेना? नवरदेव पागल आहे. बैलावर बसला आहे. साप, कवटी व राख ही त्याची विभूषणे आहेत.

पुढे नवरदेवाचे आणखी सुंदर वर्णन आहे. **'ती छार व्याल कपाल भूषण नगन जटिल भयंकरा'**

अंगावर राख फासली आहे. साप, कबरी ही विभूषण संग भूत प्रेत पिश्शाच जागिनी बिकट मुख रजनीचरा त्याच्याबरोबर भूतप्रेत पिशाच्च गोगिनी आणि भयानक तोंडाचे राक्षस आहेत.

छंः **जो जिअत रहिहि बरात देखत पुण्य वड तेहि कर सही**

जो ही वरात बघून जिवंत राहिल तो खरच पुण्यवान असेल आणि तोच पार्वतीचे लग्न बघू शकेल. अशा गोष्टी सर्व मुलांनी आपल्या घरी सांगितल्या.

**समुझि महेस समाज सब जन नि जनक मुसुकाहिं।**
**बाल बुझाएं बिबिध बिधी निडर होउ डरु नहिं।।**

महेश्वरांच्या समाजाचे हे वर्णन ऐकून आई वडिलांना हसू आल. त्यांनी आपल्या लहान मुलांना समजावून सांगितल हीच निडर व्हा. घाबरायच काही कारण नाही हीच परिस्थिती पार्वतीमातेची झाली.

वरातीना वेगवेगळ्या जानवश्यात उतरुऊन लोक परत आले. 'वर' मुलाचे औक्षण करण्याकरिता मॅना म्हणजे हिमालयाची पत्नी सुंदर सोन्याचे तबक घेऊन व आपल्या बरोबरीच्या इतर स्त्रियांना घेऊन जावयाकडे निघाली. विष्णुंना पाहून आनंद झाला. पण महादेवांना बघताच त्यांचे बिकट रुप बघून स्त्रिया फारच घाबरल्या. औक्षण न करताच पळत आपल्या घरी परतल्या. मैनेला खूप दुःख झालं. पार्वतीला जवळ घेतली आणि रडू लागली. डोळ्यांत अश्रू आले आणि म्हणाली. ज्या विधात्याने तुला इतकं सुंदर रूप दिल त्याच मूर्खाने तुझ्या वराला अस वेडं कस बनवल.

तुला सुंदर बनवणाऱ्या विधात्याने असा वेडा नवरा कसा केला. जे फळ कल्पतरुला लागावे ते फळ बाभळीच्या झाडाला का लागावे? मी तुझ्यासकट पहाडावरुन पडेन अग्नीत पडेन समुद्रात पडेन, हे केल्यामुळे माझे घर उजाड झाले. जगात माझ्या कुलाची अपकिर्ती

झाली तरीही चालेल पण ह्या असल्या वेड्या वराशी तुझं लग्न होऊ देणार नाही.

हिमालयाच्या पत्नीची ही दुःखद स्थिती बघून इतर स्त्रिया फारच व्याकुळ झाल्या. पुढच्या चौपाया अधिक सुंदर आहेत.

नारद कर मै काह बिगारा। भवनु मोर जिन्ह बसत उजारा।।

ह्या नारदाच मी काय बिघडवलं की त्यांनी माझ चांगलं घर बिघडवून टाकलं.

उपदेसु उमही जिन्ह दोन्ही बौरे बरही लागि तपु किन्हा

पार्वतीला त्यांनी असा उपदेश दिला की अशा वेळी वरासाठी तिने तप केले.

साचेहु अनेक मोह न माया उदासीन धनु धाम न जाया

खरोखरच त्यांना कोणाचा मोह नाही. माया नाही. न धन, न घर, न पत्नी असे ते उदासीन आहेत पर घर मालक लाज न **'भीरा बॉझ की जान प्रसब कै पीरा'**

म्हणूनच दुसऱ्याचे घर उजाडण्यात त्यांना लाज अथवा भीती वाटतच नाही. पण ह्यामुळे ज्याचे घर उजाड झाले त्याचे दुःख त्यांना कसे कळणार. वांझ स्त्रीला प्रसवण्याच्या पीडा कळणारच नाही हेच खरे. त्यांनतर पार्वतीने मातेला समजावून सांगितलं.

अस बिचारि सोचहि मति माता। सो न सइ जो टेइ विधाता।।
करम लिखा जौ बाऊर नाहू। तौ कत दोसु लगाइब काहू।।
तुम्ह सन मितीहीन विधी के अंका। मातु व्यर्थ जनि लेहु कलंका।।

हे माते, जे विधात्याने लिहून ठेवलं आहे त्या बद्दल विचार करू नये. माझ्या नशिबांत वेडाच नवरा लिहिला असेल तर कोणाला का दोष द्यायचा? हे माते विधात्याचे लिखीत तू मिटवू शकतेस का? तेंव्हा उगाच कुणाला कलंक लाऊ नकोस (अर्थात नारद मुनींना नाव ठेऊ नकोस)

**छंद : जनि लेहु मातु कलंकु करना परिहरहु अवसर नही।**
**दुखु सुखु जो लिखा लिलार हमरे जाब जहँ पाउ नही।।**
**सुनि उमा वचन बिनीत कोमल सकल अबला सोचही।**
**बहु भांति बिधिहि लगाइ दूषन नयन बारि विमोचही।।**

हे माता कलंक लावू नकोस, रडणं सोडून दे, रडण्याची ही वेळ नाही. माझ्या नशिबांत जे सुख दुःख लिहलेले आहे ते जेथे मी जाईन, तेथे मला मिळणारच आहे. पार्वतीचे असे विनयाने भरलेले कोमल बोलणे ऐकून सर्वच स्त्रिया विचार करू लागल्या आणि डोळ्यांतून आश्रू ढळत विधात्याला दोष देऊ लागल्या.

त्यावेळी हा सगळा समाचार ऐकून सप्तर्षी, नारदमूतीसह हिमालयाच्या घरी आले. मैनाला पार्वतीच्या मागील जन्माची कथा सांगितली आणि पुर्नजन्माच रहस्य सांगितल

**छंदःसियबेषु सती जो कीन्ह तेहिं अपराध संकर परिहरी।**
**हर विरहँ जाइ बहोरि पितु के जग्य जोगानलं जरी।।**
**अब जनमि तुम्हरे भवन निज पति लागि दारुन तपु किया।**
**अस जानि संशय तजहु बिरिजा सर्वदा संकरप्रिया।।**

सतीने जो सीतेचा वेष घेऊन जो अपराध केला त्यामुळे शंकरांनी तिचा त्याग केला. शिवजींच्या विरहाने वेडी होऊन पित्याघरी जाऊन यक्षाच्या अग्नीत भस्म झाली. आता तुमच्या घरात जन्म घेऊन आपल्या पतीसाठी तिने खूप तप केले, तेव्हा आता तू संशय सोडून दे. पार्वती तर नेहमीच शंकरजींची अर्धांगिनी आहे.

**दोहाः सुनि नारद के बचन तब सब कर मिटा विषाद।**
**छान महुँ व्यापेउ सकल पुर घर घर सह संवाद।।**

नारदांचे हे बोलणे ऐकून सर्वांच्या दुःखाचा नाश झाला आणि क्षणात सर्व गावांत हा समाचार पसरला

---

विज्ञानाचा शोध पदार्थाचा आहे, तर धर्माचा शोध चैतन्याचा आहे.

तब मयना हिमवंतु अनंदे। पुनि पुनि पारबती पद बंदे।।
नारि पुरुष सिसु जुबा सयाने। नगर लोग सब अति हरषाने।।

आणि त्यानंतरच्या सर्व चौपाई आणि दोह्यांमध्ये शिवपार्वतीच्या लग्नसोहळ्याचं वर्णन आहे. जगत पिता श्री महादेव आणि जगतजननी माता पार्वती ह्यांच्या लग्न समारंभ आणि श्री तुलसीदास महाराजांची प्रासादिक वाणी ह्यांचा सुंदर मिलाप बघायच तर ते स्वतःच वाचायला हवं. मी काय लिहिणार?

लग्न सोहळा झाला. अपार दाहिज हिमालयांनी श्री शंकरजींना दिलं. ते म्हणतात, ''का देऊ पूरनकाम संकर चरनपंकज गहि रहयो'' हे शंकरजी आपण पूर्णकाम आहांत मी आपणांस काय देऊ शकतो असं म्हणून शंकरजींचे चरण कमल धरले. शंकरजींनी त्यांचे समाधान केल मैनेने शिवजीचे चरण धरले आणि म्हणाली,

नाथ उमा मम प्रान सम गृह किकरी करेहु।
छमेहु अपराध अब होई प्रसन्न बसु देहु।।

माझ्या प्राणप्रिय उमेला तुमच्या घरची दासी करा. तिचे सर्व अपराध माफ करा हाच वर मला द्या. पार्वतीला मातेने उपदेश केला आहे.

करेहु सदा संकर पद पूजा। नारीधरमु पति देउ न दूजा।।

नारिसाठी पती शिवाय दुसरा देवच नाही. त्यामुळे तू सदा शंकरजींच्या पायांची पूजा करत जा डोळ्यांत पाणी आणून म्हणजे, **''कत विधी सृजी नारि जग माही पराधीन सपने हुँ सुख नाही''** परमेश्वराने जगात स्त्रीची निर्मिती कशाला केली. ती नेहमी पराधीन असते आणि पराधीनाला स्वप्नांतसुद्धा सुख मिळत नाही. शेवटी

**दोहा : चले संग हिमवेंतु तब पहुचावन हेतु।**
**विविध भाति परितोषु करि बिदा कीन्ह वृषकेतु।।**

हिमालय अत्यंत प्रमाने त्यांना पोहचवण्यास बरोबर आले. श्री महादेवांना त्याचा खूप संतोष करून त्यांना निरोप दिला.

जबहि संभु कैलासहि आए। सुर सब निज निज लोक सिधाए।।
जगत मातु पितु संभु भवानी। तेहि सिंगारु न कहाहु बाखानी।।
करहि बिबिध बिधि भोग विलासा। गनन्ह समेत बरहि कैलासा।।
हर गिरिजा विहार नित नयऊ। एहि बिधि बिपुल काल चलि गयऊ।।
तब जनमेउ षटबदन कुमारा। तारकु असरु समर जेहि मारा।।
आगम निगम प्रसिद्ध पुराना। षन्मुख जन्मु सकल जग जाना

शिवपार्वती विवाहाचे इतकं सुंदर वर्णन करुन श्री तुलसीदास महाराज अत्यंत लीनतेने काय लिहितात

**दोहा : चरित सिंधु गिरीजा रमन वेद न पावहि पारु।**
**बरनै तुलसीदासु किमि अति मतिमंद गवाँरु।।**

ह्या लीनतेला आपण शतशः प्रणाम करण्यापलिकडे काहीच करू शकत नाही. याज्ञवल्क्य ऋषींनी सांगितलेली शिवजींची रसाळ आणि सुंदर कथा ऐकून भारद्वाज मुनींच्या त्या कथेवरील पुढील विस्तार ऐकण्यात उत्सुकता वाढली हे पाहून याज्ञवल्क्य ऋषी आनंदित झाले. ते म्हणाले भारद्वाज मुनी तुमचा जन्म धन्य आहे. तुम्हांला गौरीपति शिवजी प्राणसमान आहेत. ज्यांना शिवजींच्या चरणावरप्रिती नाही ते रामरायांना स्वप्नांतही आवडत नाही. विश्वनाथ शिवजींच्या चरणावर निष्कपट प्रेम हेच राम भक्ताचं लक्षण आहे. तुमच्या सहवासामुळे मला आज इतकं सुख मिळतं आहे की ते मला सांगता येत नाही. श्रीराम चरित्र अत्यंत अपार आहे. करोडो शेष त्याच वर्णन करू शकणार नाही. पण मी जितक ऐकलं आहे तेवढी धनुष्य धारा श्रीरामरायांच्या प्रेरणेने तुम्हांला सांगतो.

राम चरित अति अमित मुनीसा।
कहि न सकहि सत कोटि अहीसा।।
तदपि जथाश्रुत कहॅउ बखानी।
सुमिरि गिरापति प्रभु धनुपानी।।

पुढच्या बऱ्याच चौपायांत कैलासपर्वताचं आणि त्यावर विराजमान श्री शंकरजींच सुरेख वर्णन केलेले आहे. प्रत्येक चौपाई दोहा, छंद, सोरठा इतका सुंदर आहे की त्याच सौंदर्य स्वतः वाचल्याशिवाय उपभोगता येणारच नाही. पण प्रत्येक चौपाई येथे देऊ लागलो तर विस्तार वाढेल. अर्थात प्रत्येक चौपाई तितकीच महत्वाची मधुर आहे. ती स्वतःच अनुभवावी.

तेहि गिरि पर बट बिटप बिसाला। नित नूतन सुंदर सब काला।।
त्रिविध समीर सुसीतिलि छाया। सिव विश्राम विटप श्रुति गाया।।
एक बार तेहि तर प्रभु गयऊ। तरु विलोकि उर अति सुखु भयऊ।।
निज कर डासि नागरिपु छाला।बैठे सहजहि संभु कृपाला।।
कुंद इंदु दर गौर सरीरा। भुज प्रलंब परिधन मुनिचीरा।।
तरून असुन अंबुज सम चरना। नरखदुति भगत हृदय नम हरना।।
भुजग भूति भूषन त्रिपुरारी। आननु सरद चंद धवि हारी।।

**दोहाः जटा मुकुट सुरसरित। सिर लोचन नलिन बिसाल।।**
**नीलकंठ लावन्यनिधी। सोह बालबिधु भाल।।**

बैठे रोह कामरिपु कैसे। धरे सरीर सांतरसु जैसे।।
पारबती भल अवसरु जानी। गई संभु पहि मातु भवानी।।
जानि प्रिया आदरु अति कीन्हा। बाम भाग आसनु हर दीन्हा।।
बैठी सिव समीप हरषाई। पूरब जन्मकथ चित आई।।
पति हियँ हेतु अधिक अनुमनी। बिहसि उमा बोली प्रिय बानी।।
जौ मो पर प्रसन्न सुखरासी। जनिअ सत्य मोहि निज दासी।।
जौ प्रभु हरहु मोर अग्याना। कहि रघुनाथ कथा विधी नाना।।
जासु भवनु सुरतरु तर होई । सहि कि दरिद्र जनित दुखु सोई।।
सासिभूषन असा हृदय बिचारी। हरहु नाथ मम मति भ्रम भारी।।
प्रभु जे मुनि परमारथवादी। कहहि राम कहुँ। ब्रम्ह अनादी।।
सेस सारदा बेद पुराना। सकल करहि रघुपति गुन गाना।
तुम्हा पुनि राम राम दिन राती। सादर जपहु अनँग आराती।।
रामु सो अवध नृपति सुत सोई। की अज अगुन अलखगति कोई।।

**दोहा : जौ नृप तनयत ब्रम्ह किमि नरि निरहँ मति भौरी।**
**देखि चरित महिमा सुनत भ्रमति बुद्धि अति मोरि।।**

जौ अनीह व्यापक बिमु कोऊ। कहहु बुझाई नाथ मोहि सोऊ।।
अग्य जानि रिस उर जनि धरहू। जेहि विधि मोह मिटे सोइ करहू।।
मै बन दीखि राम प्रभुताई। अति भय बिकल न तुम्हि सुनाई।।
तदपि मलिन मन बोधु न आवा। सो फ्लु भली भाँति हम पाना।।
अहूँ कछु संसउ मन मोरे। करहु कृपा बिनवउँ कर जोरे।।
तब कर अस बिमोह अब नाही। रामकथा पर रुचि मन माही।।
कहहु पुनीत राम गुन गाथा। भुजनराज भूषन सुरगाथा।।

**दोहा : बंदऊँ पद धरि धरनि सिरु विनय करऊँ कर जो रि।**
**बरनहु रघुवर बिसद जसु श्रुति सिद्धांत निचोरि।।**

अति आरति पुछऊँ सुरराया। रघुपति कथा कहहु करि दाया।।
प्रथम सो कारन कहहु बिचारी। निर्गुन ब्रम्ह सगुन बपु धारी।।
कहहु जथा जानकी बिवाही। राज तजा सो दूषन काही।।
बनबसि कीन्हे चरित अपारा । कहहु नाथ जिमि रावन मारा।।

भययुक्त अंतःकरणाने त्यांनी नारदमुनींची क्षमा मागितली. त्यांना वंदन करुन तो इंद्राच्या दरबारात गेला. आपली करणीवर नारद मुनींची सुशीलता ह्याची सर्व माहिती इंद्राला दिली. सर्वांना फार आश्चर्य वाटलं. नारद मुनींची प्रशंसा केली आणि रमापतींना वंदन केले.

नारद मुनी पुढे श्री शंकराकडे गेले. आपण कामदेवावर विजय मिळवला ह्याचा त्यांच्या मनात अभिमान जागृत झाला. कामदेवाची सर्व करणी श्री शंकरानी कथित केली. शंकरांनी त्यांना आपले अत्यंत प्रिय मित्र म्हणून सांगितले की हे नारद परत परत विनंती करतो ज्याप्रमाणे मला ही कथा सांगितली तशी कथा हरी म्हणजे रमापति म्हणजेच विष्णू भगवांनाना सांगू नका. प्रसंग आलाच तर ती कथा लपवून ठेवा

बार बार बिनवउँ मुनि तोहि। जिमि यह कथा सुनायहु मोही।।
तिमि जनि हरिहि सुवावहु कबहूँ। चलउँ प्रसंग दुराएहु तबहूँ।।

रामरायांच्या मनात जे येते तेच होते. एकदा नारद मुनि क्षीरसागरावर हातात वीणा घेऊन हरी गुण गात गात

पोहचले. भगवंतांनी त्यांचे स्वागत केले. त्यांच्या सकट आपल्या आसनावर बसले. नारदाला म्हणाले, नारदा खूप दिवसांनी माझ्यावर कृपा करून भेटायला आलात. त्यावर नारदांनी दिलेला उपदेश न मानता कामदेवाची सर्व कथा विष्णूंना सांगितली. श्री विष्णूंची माया ज्याला मोहात पाडू शकत नाही असा ह्या जगात कोण आहे.

विष्णू त्यांना म्हणाले हे मुनि ज्याच्या ह्रदयात क्षान वैराग्य आहे त्याला मोह कसा होणार तर ब्रम्हचर्य व्रताचे पालन करणारे उत्तम मती असणारे आहात. तुम्हांला कामदेव काय पिडा देणार.

ब्रम्हचरज ब्रत रत मतिधीरा। तुम्हहि कि करई मनोभव पीरा।

नारदमुनिंनी अभिमानाने सांगितले की सर्व आपलीच कृपा आहे. भगवतांच्या लक्षात आले की नारदमुनींच्या मनात गर्वाचा अंकुर निर्माण झाला आहे. त्याचे उच्चाटण मला करावंच लागेल कारण सेवकाचे हित करण हा माझा पणच आहे. मुनिच हित आणि माझ कौतुक होईल असा उपाय मी करीन त्यावेळी नारद मुनि अत्यंत अभिमानासहित भगवंताला वंदन करून निघाले भगवंतांनी आपल्या मायेला प्रेरणा केली आणि तिने अत्यंत कठीण अशी करणी केली.

**प्राचार्य सी. श्री. मुजुमदार**
१०४, फ्लॅट सी-२, इमारत क्रं-३,
सी. एन.सी. रॉयल पार्क,
कांजुरमार्ग, मुंबई - ४०००४२.
भ्रमणध्वनी : ९७६९३१०७४६

●●●

***दिशा संपर्क दूरध्वनी***

**०२२-२५४२ ६२७०**

## बर्फ वितळते आहे

ध्रुवांवरील दहा ते बारा अभ्यासांमधून हे सिद्ध झाले आहे की बर्फाच्या लाद्या वेगाने वितळत आहेत. त्यांतील अंटार्टिका व ग्रीनलँड येथे आता तिप्पट वेगाने बर्फ वितळत आहे. २० वर्षांपूर्वी वितळण्याचे जे प्रमाण होते व वेग होता त्या तिप्पट असा हा वेग आहे. ग्रीनलँड येथे तर ९० च्या दशकाशी तुलना केली तर एकट्या ग्रीनलँड येथे बर्फ वितळण्याचे प्रमाण पाच पट आहे.

पूर्वी बर्फ वितळण्याच्या अंदाजात सातत्य नव्हते. याबद्दल माहिती देताना युनायटेड किंग्डम मधील लीडस विद्यापीठातील अँड्र शेफर्ट व एरिक इव्हिन्स (नासा जेटर प्रॉप्युल्शन प्रयोगशाळा, पॅसाडेना कॅलिफोर्निया) व त्यांचे सहकारी चार वेळा अंतराळ यानातून उपलब्ध माहितीचा बर्फाच्या चार प्रकारांचा समावेश असणाऱ्या - बर्फाच्या लादीच्या घनतेची तुलना केली. त्यांच्या असे निदर्शनास आले की १९९२ पासून बर्फाच्या लाद्या ११ मिली मीटर्स (समुद्र सपाटीपासून) कमी झाल्या.

या लेखकांचे म्हणणे आहे की त्यांचा हा अंदाज आंतर शासकीय समितीच्या वातावरणातील बदल या अहवालाच्या २ ते ३ पट अचूक आहे.

संदर्भ : ६ डिसेंबर २०१२, खंड ३९२, नेचर
अधिक तपशील- 90.namre.com yapp6a

# श्री. माधव नामदेव पाटील - अविस्मरणीय आठवणी

*कै. मा. ना. पाटील यांच्या आठवणी सांगणारे, श्रद्धांजली वाहणारे हे काही लेख*

वार होता मंगळवार दिवस होता २६ मार्च २०१३ होळी पौर्णिमेचा. सकाळी ७ वाजता दूरध्वनी खणाणला. मी झोपलेलोच होतो. माझ्या मुलाने अनिलने तो घेतला. दुरून माझे सहकारी श्री. दिलीप जोशी बोलत होते. ते बोलले ''अनिल आज पहाटे अडीच चे सुमारास मा. ना. पाटील गेले.'' अण्णांना सांग. मी नेहमीप्रमाणे सकाळी ८ वाजता उठलो. ती ही दुःखद बातमी कानावर आली. मन सुन्न झाले. सकाळी ११ चे सुमारास त्यांचे घरी अंत्यदर्शन घेऊन दुःखद अंतःकरणाने व विचलित मनाने घरी परत आलो. साडेचार तपाचे वर झालेला माझा सहवास एका क्षणात संपुष्टात आला.

मा. ना. पाटील यांचा जन्म नाशिक येथे १९ जुलै १९२६ चा. प्राथमिक शिक्षणही तेथेच घेऊन ते मॅट्रिक १९४५ मध्ये उत्तीर्ण झाले. काही दिवस मित्रांबरोबर लाहोर येथे वास्तव्य करुन भारतात परत आल्यावर त्यांना ठाणे डिस्ट्रिक कोर्टात टंकलेखकाची नोकरी मिळाली. टंकलेखनावर त्यांचे प्रावीण्य होते. ते लघुलेखनही शिकले होते. तदनंतर त्यांनी मुंबईला स्वतंत्र ग्रेटर बॉम्बे कोर्टात बदली करुन घेऊन ते १९५७ पर्यंत कार्यरत होते. येथे काम करताना त्यांना बऱ्याच जुन्या नामवंत वकीलांची व न्यायमूर्तीचे टंकलेखक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. १९४५ ते १९५७ दरम्यान त्यांनी सरकार मार्फत दुय्यम फौज योजने अंतर्गत १९५२ पर्यंत सैनिक शिक्षणही घेतले. १९५२ नंतर मुंबई मधील दुय्यम फौज व्यवस्था कोल्हापुरला हलवली गेली. व त्यांची सुटका झाली. या सरकारी व लष्करी कामातून मोकळे झाल्यावर त्यांना नियमाप्रमाणे पेन्शन सुरु झाली. ती आजतागायत चालू होती.

१९५७ चे सुमारास मुंबईला स्वतंत्र ग्रेटर बॉम्बे कोर्टात असोसिएटेड सिमेंट कंपनीचा एक दावा होता. कोर्टाचा निकाल लागल्यावर कंपनीला या निकालाची प्रत हवी होती. म्हणून एक अधिकारी स्वतः कोर्टात गेला व पाटीलांचे तर्फे त्याने प्रत मिळविली. हा अधिकारी मा. ना. पाटीलांचे टंकलेखन पाहून खूष झाला. व त्यांनी पाटलांना कंपनीत नोकरी मिळवून दिली. पाटलांनी १९५७ ते १९६४ पर्यंत चर्चगेटला हेड ऑफिसमध्ये काम केले. त्यांचा स्वभाव शांत व अबोल होता. तसेच निरलस व निरपेक्ष सेवा वाखाणण्यासारखी होती. सहकाऱ्यांच्यामधे तर ते सहज मिसळून वागत असत. त्यांनी १९६४ साली ठाणे येथील Central Research Station मध्ये बदली करून घेतली. त्यांच्या वक्तशीर व चोख कामामुळे पाटील यांना कंपनीने १-२ वर्षाचा सेवाकाळ वाढवून दिला. ते १९८९-९० मध्ये सेवामुक्त झाले.

मुंबई व ठाणे येथे कामा व्यतिरिक्त इतरही बऱ्याच प्रयोगशील कार्यामध्ये त्यांचा सहवास होता. आमच्या ग्रुपच्या लोणावळा, खंडाळा, खोपोली वार्षिक पावसाळी सहली. ठरलेल्या त्यात त्याचाही प्रामुख्याने भाग असायचा. महाविद्यालयीन विद्यार्थ्याप्रमाणे चेष्टा-मस्करी भरपूर. पण पाटील मात्र स्तब्ध, स्वभाव शांत, राग लोभ काही नाही. अबोल, पण एखाद्याविषयी किल्ली दिली की, ते मनसोक्त भरपूर भाषण करायचे. विषयांतर तर कितीदा आनंदी, सुखी. पाटील ए.सी.सी. मधून जरी निवृत्त झाले तरी त्यांचा एकूण १९६४ पासूनचा L.I.C. Agent चा व्यवसाय २००० पर्यंत चालूच होता.

---

परमेश्वर हा अनुभवाने जाणायचा असतो.

मा. ना. पाटील ए.सी.सी. मध्ये १९५७ साली रुजू झाल्यावर त्यांची गुणाकर जोशी, ठाणे नौपाडा ग्राम पंचायतचे सरपंच, यांच्याशी ओळख झाली. श्री. जोशी हे चर्चगेटला ए.सी.सी.मध्ये कामाला होते. तसेच वि.प्र. मंडळाचे सदस्यही होते. साहजिकच ठाण्यातील नागरिक संपर्कामुळे, डॉ. वा. ना. बेडेकर (Founder Member), वि. प्र. मंडळ, ठाणे, यांच्याशी त्यांचा जवळचा संबंध आला. या निमित्ताने पाटलांची १९५७ पासून वि. प्र. मंडळाच्या कार्यात सहभाग सुरु झाला. पाटलांची वि. प्र. मंडळामध्ये १९५८ ते १९८८ पर्यंत कार्यवाह म्हणून ३० वर्षे, १९८९-१९९० कार्याध्यक्ष व १९९०-९३ सहकार्यवाह म्हणून सेवा झाली. मंडळाच्या प्रत्येक शालेय / महाविद्यालयीन कार्यक्रमात त्यांचा जातीने सहभाग होता. हल्ली ते कार्यकारी मंडळाचे सभासद होते. वयोमानाप्रमाणे पूर्वीसारखी हालचाल होत नव्हती. ऐकू येणे कमी झाले होते. दृष्टीही कमी झाली. परंतु सभेस मात्र त्यांची आवर्जून उपस्थिती असाची. वयाच्या ८० व्या वर्षी मंडळाची दीर्घसेवा केल्यामुळे पाटील यांचा मंडळाने मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार १.८.२००५ रोजी केला.

वि. प्र. मंडळाचा लेखी इतिहास ‘तयाचा वेलु गेला गगनावरी’ लिहिला गेला आहे. हे नवचैत्यनच आहे. पहिले मराठी आवृत्तीचे लेखन कै. अ. धो. टिल्लू यांनी १९९६ मध्ये केले. तर दुसरी आवृत्ती २००० मध्ये छायांकित केली. तिसरी आवृत्ती पाटील यांनी लिहिली असून ती २००९ मध्ये प्रसिद्ध झाली. तसेच पाटील यांनी पुस्तकाची पहिली इंग्रजी आवृत्ती "A Seedling Grows Into A Tree" 2005 मध्ये काढली. या आवृत्तीत सोप्या तांत्रिक सुधारणा व काही अधिक माहिती गोळा करुन इंग्रजी रूपांतरित पुस्तकात १९३५ ते २०१० पर्यंतची माहिती तयार करून ते पुस्तक १४.४.१०१३ ला डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या नवव्या स्मृतीदिनी प्रसिद्ध झाले.

मा. ना. पाटील हे एक संगीत प्रेमी व सच्चे सामाजिक कार्यकर्ते होऊन गेले. ते श्री सत्यसाईबाबांचे परमभक्त होते. ठाण्यातील साईभक्त मंडळाबरोबर जाऊन त्यांनी तिरुपती येथे ८-१० दिवसाचे मुक्कामात बरीच वर्षे जनसेवा केली आहे. ते निस्वार्थ व निरपेक्ष हेतूने सेवा करीत. अंगावर पडेल ते काम अत्यंत सचोटीने अभ्यासपूर्वक रीतीने पूर्ण करण्याची त्यांची हातोटी होती. शांत राहून न रागावता पुढे जायचे हे त्यांचे ध्येय होते. त्यांच्याविषयी लिहावे तेवढे थोडेच असे हे मा. ना. पाटील जरी आपल्यातून कायमचे गेले तरी त्यांची स्मृती सदैव आपल्या स्मरणात राहणार आहे.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच प्रार्थना.

**श्री. वि. करंदीकर**
ज्येष्ठ कार्यकारी सभासद
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

---

कै. वा. ना. बेडेकर यांचे निकटवर्ती श्री. पाटील हे मंडळाच्या सर्व प्रकल्पांची प्रगती जवळून पाहणारे पहिले व शेवटपर्यंत सदस्य होते. निगर्वी, सरळ, साधा स्वभाव हे त्यांच्या व्यक्तिरेखेचे वैशिष्ट्य चिरकाळ लक्षात राहणारे आहे. विद्या प्रसारक मंडळाने ठाण्यातल्या रहिवाश्यांना उत्कृष्ट शिक्षण सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व संस्थांची उभारणी करताना कै. वा. ना. बेडेकर यांच्याबरोबर सर्व कामांमध्ये श्री. पाटील यांचीही महत्वाची भूमिका होती. १९५५ पासून मंडळाचे ते सक्रिय सदस्य होते व एकूण सहा दशके ते कार्यरत होते.

१९८३ साली मंडळाचे तत्कालीन कार्याध्यक्ष श्री. रा. कृ. गोखले यांच्या पुढाकाराने तंत्रनिकेतनाची सुरुवात झाली. अपुरे मनुष्यबळ, आर्थिक चणचण तसेच जागेअभावी १९८५ पर्यंत ही संस्था विज्ञान महाविद्यालयात होती. चांगले तंत्रशिक्षण देणारी संस्था ठाण्यात उभारण्याचा श्री. गोखले यांचा मानस होता. त्यात कै. डॉ. बेडेकर व श्री. पाटील यांनीही तन्मयतेने

सहकार्य केले होते. श्री. पाटील यांचे चिरंजीव मोहन या संस्थेतच शिकत होता. मी त्याला शिकवत असताना त्यांनी कधीही याची जाणीव होऊ दिली नाही. मुख्य म्हणजे मोहन हा त्यांचा सुपुत्र आहे. ही बाब त्याचा डिप्लोमा पूर्ण होईपर्यंत मला माहीत नव्हती. या शिक्षणाचे बळावर आता तो 'एअर इंडिया' मध्ये कार्यरत आहे. याचा त्यांना अभिमान होता. तीन वर्षापूर्वी त्यांचा नातू नंदनही आपल्या तंत्रनिकेतनातून शिक्षण घेण्यासाठी रुजू झाला व त्याचेही शिक्षण पूर्ण झाले आहे.

कै. वा. ना. बेडेकर यांच्या समाजसेवेतील ''सत्कर्म प्रतिष्ठान'' या उपक्रमामध्ये ते पदाधिकारी होते. तंत्रनिकेतनातील आतापर्यंत एकूण ३१ विद्यार्थ्यांना या प्रतिष्ठान तर्फे शिष्यवृत्ती मिळालेली आहे. हे प्रतिष्ठान गरजू महिलांना उपजिवीकेचे साधन व वृद्ध लोकांची देखरेख करणारी माणसे देऊन मदतीचे हात पुढे करत आहे. ज्या महिलांनी उत्कृष्ट सेवा केली आहे त्यांचे कौतुकही दरवर्षी हे प्रतिष्ठान करत आहे.

मंडळाची व सर्व संस्थाची प्रगती पाहून श्री. पाटील समाधानी होते. कुठल्याही प्रकारच्या प्रसिद्धीची अपेक्षा न करता निःस्वार्थ भावनेने त्यांनी मंडळाची व समाजाची सेवा केली. त्यांच्या निधनाने आम्ही एक आपुलकीचा मार्गदर्शक गमावला आहे.

**प्रा. दि. कृ. नायक**
प्राचार्य
विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे

---

## कै. श्री. मा. ना. पाटील एक आदरणीय व्यक्तिमत्त्व

श्री. मा. ना. पाटील यांच्या सहवासातील गेल्या २७ वर्षांतील आठवणींचा उजाळा त्यांच्या २५.०३.२०१३ रोजी झालेल्या दुःखद निधनाच्या बातमीमुळे मनात आला. त्यांपैकी काहींचा उल्लेख करण्याचे भाग्य मला लाभले आहे.

मी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात १९८६ मध्ये प्राचार्य पदावर रुजू झालो. पूर्वी भागुभाई मफतलाल तंत्रनिकेतनात या पदावर काम करीत होतो त्या वेळी मंडळाचे सभासद वगैरे मंडळींचे कार्यक्रमातच दर्शन होई. आणि तशी ती मंडळी फार मोठ्या पदावरची आणि व्यक्तिमत्वाची माणसे होती. त्यामुळे प्राचार्य पदावर रुजू झाल्यानंतर याबाबतीत आपण कितपत comfortable होऊ शकू ही धास्ती होती. पण विद्या प्रसारक मंडळाच्या पहिल्या मिटिंगला हजर राहतात ती शंका पार नाहीशी झाली. डॉ. वा. ना. बेडेकर, श्री. मा. ना. पाटील, श्री. करंदीकर, श्री. गोखले, श्री. टिल्लू ही सर्व मंडळी फारच साधी वाटली. श्री. मा. ना. पाटील हे कार्यवाह होते. त्यावेळी श्री. रा. कृ. गोखले हे तंत्रनिकेतनाचे प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर होते. त्यामुळे तसा माझा या मंडळींशी थेट संबंध येत नव्हता. पण १९८७ ला श्री. रा. कृ. गोखले यांचे निधन झाल्यानंतर माझा श्री. मा. ना. पाटील, डॉ. वा. ना. बेडेकर व इतर सभासदांशी जास्त संबंध येऊ लागला. सगळीच मंडळी फारच सभ्य, सुसंस्कृत होतीच. कारण प्रत्येकाची विद्या प्रसारक मंडळाच्या शिक्षण प्रसाराच्या तत्त्वावर निष्ठा होती. त्यांतून तंत्रनिकेतन तर सर्वांत नवीन. त्यामुळे त्याच्या विकासाला गती देण्याची प्रत्येकाचीच इच्छा होती.

डॉ. वा. ना. बेडेकरांबद्दल आदरयुक्त भीती वाटायची. ते कुठलीच गोष्ट नाकारत नसंत, पण ती गोष्ट मा. ना. पाटीलांच्या तर्फे गेली की चटकन स्वीकारली जाई. श्री. मा. ना. पाटलांवर त्यांचा खूप विश्वास होता. तंत्रनिकेतनाच्या सुधारणांच्या बाबतीत ते तत्पर असत सुरुवातीच्या काळात फिजिक्स, केमिस्ट्रीच्या प्रयोगशाळा नव्हत्या ते प्रॅक्टिकल बी. एन. बांदोडकर महाविद्यालयामध्ये करुन घेतले जाई. रविवारीसुद्धा मुलांना यावे लागे. तेव्हा आम्ही सर्वांनी मिळून तंत्रनिकेतनासाठी चार वेगळ्या खोल्या बांधून देण्याचा प्रस्ताव श्री. मा. ना. पाटील ह्यांच्याकडे घेऊन गेलो.

---

तो त्यांना पटला. डॉ. साहेबांनाही त्यांनी त्या बाबत आपले अनुकूल मत दिले आणि चार वेगळ्या खोल्या मिळाल्या. फिजिक्स, केमिस्ट्री, अप्लाईड मेकॅनिक्स इत्यादी प्रयोगशाळांत आमच्या विद्यार्थ्यांची प्रात्याक्षिके सुरु झाली. अशी अनेक कामे मा. ना. पाटलांनी करून दिली. छोट्या छोट्या गोष्टी पण त्यांना सांगतांना संकोच वाटायचा नाही. नंतर त्यांचा मुलगा चिरंजीव मोहन आमच्याच तंत्रनिकेतनांत शिकायला होता पण मी मोठ्या पदावरील व्यक्तीचा मुलगा आहे असा त्यांचा दृष्टिकोन नव्हता अथवा त्याला काही वेगळी वागणूक मिळावी असा पाटील सरांचाही आग्रह नसायचा. नंतर बरीच वर्ष त्यांचा संबंध येत गेला. डॉ. बेडेकरांच्या शोकसभेत भाषण करीत असताना त्यांचा दाटून आलेला कंठही मला अजून आठवतो.

२००४ मध्ये मी प्राचार्य पदावरून निवृत्त झालो. पण पाटील सरांचा सहवास येतच गेला. ते जातीने चौकशी करायचे. वयोमानेने कार्यक्षमता कमी झाली असेलही, पण विद्या प्रसारक मंडळावरील त्यांचे प्रेम कमी झाले नव्हते. अजूनही मंडळाच्या कार्यालयांत ते येतच असायचे.

तंत्रनिकेतनातील गरीब पण हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत सत्कर्म प्रतिष्ठानचे कार्यवाह कै. मा. ना. पाटील व सौ. अल्पना बापट हे २००७–२००८ पासून करीत आहेत.

''तयाचा वेलु गेला गगनावरी'' या पुस्तकाचे दुसऱ्या आवृत्तीचे लेखनही त्यांनी केले. या पुस्तकात विद्या प्रसारक मंडळाच्या प्रगतीचा इतिहास व आढावा आहे.

आयुष्यात श्री. मा. ना. पाटलांसारखी माणसं मिळणे व त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळणं हे भाग्यच! आमच्या तंत्रनिकेतनातर्फे त्यांना श्रद्धांजली.

**प्रा. सी. श्री. मुजुमदार**
माजी प्राचार्य
वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे

## परमेश्वराचे प्रेम

देवाचे प्रेम हे फक्त सत्य आहे. ते किती महान आनंददायी आहे हे आपल्याला जाणवले पाहिजे. जगातील लोक असा विचार करतात की, ''हे मी केले, मी तो मूक आनंद घेतला.'' पण ते जे काही करत असतील वा आनंद घेत असतील तो क्षणभंगुर आहे; संपणारा आहे. पण परमेश्वराच्या प्रेमाला व आनंदाला अंत नाही. ज्याने हा अनुभव घेतला असेल. ज्याला हा अनुभव जाणवला असेल त्याला त्या जागी दुसरे काहीही जाणवणार नाही. आपल्याला खऱ्या अर्थाने परमेश्वराचे हे प्रेमच हवे असते; आणि ते खोलवर स्वतःला जाणल्याशिवाय, आत्मजाणीव झाल्याशिवाय जाणवणार नाही.

श्री. राजश्री जनकानंद
'राजश्री जनकानंद : ग्रेट वेस्टर्न योगी'
स्पिरिच्युल डायरी (१२ फेब्रुवारीचे चिंतन)

**– संकलित**

# अष्टविनायक दर्शन

*अष्टविनायकाच्या सहलीत ही आठ पवित्र गणेश स्थाने पाहणे हा अनुभव असतो. सदर लेखात अशाच एका सहलीचे वर्णन आले आहे. यांतील प्रत्येक गणपतीवर स्वतंत्र लेख लिहिण्याचा प्रयत्न लेखकांनी केला आहे.*




सुमारे पाच वर्षापूर्वी वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतन मधील आठ–दहा सदस्य एकत्र येवून एक भ्रमण मंडळ स्थापन केल आहे. हे सदस्य दरवर्षी कोठे तरी फिरून येत असतात. कधी जवळ तर कधी लांबच्या सहली करतात. या अगोदर आम्ही मंडळी प्रसिद्ध नामधारी श्री. गोंदवलेकर महाराज समाधी, गोंदिवले, गुजरातमध्ये गरुडेश्वर आणि गुमानखे, तामिळनाडू व आंध्रप्रदेशात अनुक्रमे रामेश्वर, कन्याकुमारी व तिरुपती बालाजी दर्शन, मध्यप्रदेशात महाकाळ दर्शन इत्यादी ठिकाणी जाऊन आलेले आहोत.

अष्टविनायक दर्शन ही आमची पाचवी सहल होती. या अगोदरच्या सर्व सहली आम्ही माजी प्राचार्य श्री. एस. एस. मुजुमदार सरांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या होत्या. ही सहल सुद्धा त्यांच्याच नेतृत्त्वाखाली पार पडली. सरांनी मंडळाच्या सदस्यांना अष्टविनायक दर्शनासाठी जायचं आहे अस सूचित केले त्याप्रमाणे सरांनी आराखडा तयार केला. २६ आक्टोबर २०१२ रोजी सहलीला मुंबईहून प्रारंभ केला. ह्यावेळेस आम्ही आठ सदस्य होतो. आमच्या ह्या सहलीत आर्थिक खर्चाची हाताळणी करणारे श्री. बोरुडे सर त्यांच्या वडिलांची तब्येत बरी नसल्यामुळे येऊ शकले नाव्हते. आम्हा मंडळीना त्यांचीच एक उणीव भासत होती. मुंबई – गोवा मार्गावरून प्रथम पालीच्या गणपती दर्शनासाठी गेलो. सोबत स्वतंत्र वाहन असल्यामुळे काही अडचण येत नव्हती.

पालीचा गणपती हा अष्टविनायकापैकी एक या

गणेशाला बल्लाळेश्वर म्हणतात. हे पूर्वाभिमुख स्वयंभू स्थान आहे. कपाळ विशाल असून डोळ्यात हिरे आहेत. मंदिर



**पालीचा बल्लाळेश्वर**

चिरेबंदी आहे. मंदिरात प्रचंड घंटा असून ती चिमाजी आप्पांनी अर्पण केली आहे. हे स्थान रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात पाली येथे आहे. सुधागड या भव्य किल्ल्याची पार्श्वभूमी व अंबानदीच्या निसर्गरम्य सान्निध्यात बल्लाळेश्वर मंदिर वसले आहे.

पालीहून ३८ किमी वर खोपोलीपासून १.५ कि.मी. अंतरावर महड या ठिकाणी गेलो. महडचा गणपती वरद विनायक नावाने प्रसिद्ध आहे. या मंदिरा संदर्भात एक कथा आहे की एका भक्ताला स्वप्नात देवळाच्या मागील बाजूस असलेल्या तळ्यात पडलेली मूर्ती दिसली त्याप्रमाणे त्या भक्ताने शोध घेतला व मूर्ती मिळाली तीच या मंदिरातील प्रतिष्ठापना केलेली मूर्ती होय. मंदिरात दगडी महिरप असून गणेशाची मूर्ती सिंहासनारूढ आहे. हा गणपती उजव्या



**महडचा गणपती वरद विनायक**

सोंडेचा आहे. इ. स. १७२५ मध्ये पेशवे काळात हे मंदिर बांधले गेले आहे. रायगड जिल्ह्यातील महड पुणे मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चारवर खोपोलीजवळ आहे. साधारण तीन वाजले होते. रांगेने दर्शन होवून आम्ही मंडळी पुण्याकडे निघालो. वाटेतच लोणावळ्याच्यापुढे प्रतिबालाजीचे दर्शन घेतले. नंतर थेऊरच्या चिंतामणी दर्शनासाठी निघालो. थेऊरला पोहचायला आठ ते साडे आठ वाजले होते.

थेऊरच्या श्री चिंतामणी हा अष्टविनायकापैकी एक. कदंब वृक्षाखाली ह्या थेऊरच्या गणेशाचे स्थान, भक्ताच्या चिंतेचे हरण करणारा म्हणून चिंतामणी. पेशव्याचे ते



**थेऊरचा चिंतामणी**

आराध्य दैवत. माधवराव पेशवे यांनी थेऊरचा विस्तार केला. त्यांचे निधनही थेऊरलाच झाले. मंदिराच्या आवारात थोरल्या माधवरावांची स्फूर्तिदायक कारकीर्द दाखविणारे कलात्मक दालन आहे. आम्ही मंडळींनी चिंतामणीची प्रार्थना करून मनोभावे दर्शन घेतले. नियोजनानुसार तेथून आम्ही रात्री मुक्कामासाठी मोरगावकडे गेलो. भक्त निवासात राहिले. दिवसभरच्या प्रवासामुळे थकवा होता. जेवण करून झोपी गेलो.

दि. २७ ऑक्टोबर २०१२ रोजी सकाळी लवकर उठून तयार होवून श्री मयूरेश्वराच्या दर्शनाला गेलो. सकाळी-सकाळी अत्यंत मनोभावे दर्शन झाले. थोर

गणेशभक्त मोरया गोसावी यांनी येथील पूजेचा वसा घेतला होता. स्वयंभू व आद्यस्थान असलेली ही गणेशाची मूर्ती आहे. प्रत्येक घरा-घरात म्हटली जाणारी 'सुखहर्ता दुःखहर्ता' ही गणपतीची आरती श्री समर्थ रामदास स्वामींना याच मंदिरात स्फुरली असे म्हटले जाते. मंदिराचे बांधकाम



**मोरगांवचा श्री मयूरेश्वर**

दगडी असून भव्य असे नक्षीकाम केलेले आहे. जवळच कऱ्हा नदी आहे. स्थान पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यात आहे. मयूरेश्वराचे दर्शन घेऊन आम्ही मंडळी संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या जेजुरीच्या खंडेरायाच्या दर्शनासाठी गेलो. खंडेरायाचे दर्शन घेऊन मोरगावमार्गे आम्ही सिद्धटेककडे निघालो. वाटेतच चहानाष्टा केला. सिद्धटेकला दौंडमार्गे साधारण सकाळी अकराच्या दरम्यान पोहचलो. हे भीमानगरीच्या काठावर वसलेले सिद्धीविनायकाचे स्वयंभू स्थान. पुण्यश्लोक अहिल्याबाई



**सिद्धटेकचा सिद्धेश्वर**

होळकर यांनी जीर्णोद्धार करून मंदिर बांधले आहे. हे स्थान अहमदनगर जिल्ह्यातले कर्जत तालुक्यात आहे.

सिद्धटेकचे दर्शन घेऊन रांजणगावकडे कूच झाले. दुपारचे दीड वाजले होते. रांजणगावच्या गणपतीस 'महागणपती' असे म्हटले जाते. अगोदर दर्शन घेतले.



**रांजणगावचा महागणपती**

मंदिरात कोरलेली चित्रे पाहिली. सर्वात शक्तिमान रुप असे म्हटले जाते. श्रीची मूर्ती ही उजव्या सोंडेची मोहक व प्रसन्न आहे. याच ठिकाणी आम्ही दुपारचा प्रसाद घेतला व पुढच्या गणेश दर्शनाला ओझरकडे निघालो.

दुपारी चार वाजता ओझरला पोहचलो. कुकडी नदीच्या किनाऱ्यावर हे मंदिर वसले आहे. हे एक जागृत स्थान आहे. मंदिराच्या चारही बाजूला तटबंदी बांधकाम



**ओझरचा विघ्नेश्वर**

असून मध्यभागी गणेशाचे मंदिर आहे. आम्ही मंडळींनी आरती म्हटली, दर्शन घेवून जवळच तेथे शनिमंदिर होते तेथे गेलो. शनि अमावस्या होती शनि दर्शनाने धन्य वाटले.

ओझरहून आम्ही परत लेण्याद्रीकडे वळलो. त्या ठिकाणी आम्ही रात्री मुक्काम केला. पायथ्याशीच असलेल्या भक्त निवासात राहिलो. दिनांक २८.१०.२०१२ रोजी सकाळी लवकर उठलो, तयार झालो. सर्वजण लेण्याद्रीच्या गणेश दर्शनासाठी पायऱ्या चढू लागलो. मंदिरात जाण्यासाठी सुमारे चारशे पायऱ्या आहेत. जुन्नर तालुक्यतात लेण्यांच्या समुदायात आणि कुकडी नदीच्या परिसरात डोंगरावर श्री गिरीजात्मक गणेशाचे स्वयंभू स्थान आहे. श्रीची प्रसन्न मूर्ती असून ती दगडात कोरलेली आहे. मंदिर परिसरातील खडकामध्ये कोरीवकाम, खोदकाम केलेले आहे. पेशवे काळात या



**लेण्याद्रीचा गिरीजात्मक**

मंदिराचा जीर्णोद्धार झाला होता. हे स्थान जुन्नरपासून सात किमी अंतरावर आहे, तर पुण्यापासून सुमारे ९७ कि.मी अंतर पार करावे लागते. सर्व आठ गणेशांचे दर्शन घेवून आम्ही साडे नऊ ते दहाच्या दरम्यान परतीच्या प्रवासाला निघालो. येता-येता शिवनेरी किल्ला पाहिला. शिवाई देवीचे दर्शन घेतले. गडावर शिवजन्म स्थान पाहिले. शिवनेरीवर आम्ही मंडळींनी बरीच छायाचित्रे काढली. त्यानंतर आम्ही भीमाशंकरकडे वळलो. बारा ज्योर्तिलिंगापैकी एक हे ठिकाण आहे. साधारण तीन वाजले होते. दर्शन घेऊन आम्ही परत मुंबईकडे परतलो.

खरोखरच अष्टविनायक ही महाराष्ट्रातील आठ मानाची व प्रतिष्ठेची गणेश मंदिरे आहेत. पश्चिम महाराष्ट्र व कोकणात बहुतेक ही मंदिरे असून ह्या देवतांना मोठा इतिहास आहे. ह्या सर्व देवळांना पेशव्यांचा आश्रय असल्यामुळे त्यांना पेशवाईच्या काळात महत्त्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्रातील 'आठ' ठिकाणच्या श्री गणपतीच्या मंदिरास मिळून 'अष्टविनायक' म्हटले जाते. ही मंदिरे महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहेत. देशातील कानाकोपऱ्यातील असंख्य भाविक अष्ट विनायकाची यात्रा करतात. गणपती ही विद्येची देवता असून तो सुखकर्ता, दुखहर्ता आणि रक्षणकर्ता आहे अशी गणेशभक्तांची भावना आहे.

**श्री. चंद्रकांत शिंगाडे**
वि. प्र. मंडळाचे तंत्र निकेतन,
ठाणे

●●●

## पर्यावरण

मानवाने पर्यावरणाचा आणि विशेष म्हणजे स्वतःच्या सुरक्षिततेचा विचार करुन काही पावले तातडीने उचलल्यास पुढील अनेक संभाव्य धोके टाळता येणे शक्य आहे. वाढत्या उद्योग धंद्यांमुळे वातावरणात वाढणारे कार्बन-डायऑक्साईडचे प्रमाण दरवर्षी अडीच टक्क्यांनी बरी कमी झाले तरी पुढील काळात वाढणारे तापमानाचे प्रमाण बऱ्याच अंशी कमी होईल. हिमालयातील डोंगरावरील आणि हिमनद्यांमधील बर्फ वितळण्याचे प्रमाण कमी होऊन वाढणाऱ्या सागर पातळीला पायबंद घातला जाईल. त्यामुळे भविष्यातील नुकसानीला प्रतिबंध घातला जाईल.

**- संग्रहातून**

# साहित्य-जगत

*ग्रंथ प्रेमींच्या खास आवडीचे हे सदर. प्रत्यक्ष भेटीत याबद्दल अनेकजण चांगल्या प्रतिक्रिया देतात - संपादक*

**विठ्ठलराय भट यांची ४ नवी पुस्तके प्रकाशित**

''आजच्या तरुण पिढीला लक्षावधी स्वातंत्र्य सैनिकांनी देशाला स्वतंत्र करण्यासाठी किती महान त्याग केला आहे याची कल्पना नाही. आज आम्ही स्वतंत्र भारतात राहत असून सर्व तऱ्हेच्या मूलभूत हक्कांचा उपभोग घेत आहोत. ज्या देशातील तरुण वर्ग क्रांतिकारकांचा ऋणी असतो, तोच प्रगती करतो. क्रांतिकारकांचे मुकुटमणी शोभणाऱ्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांना समजून घेणे, हा एक आनंदाचा व स्फूर्तिदायक असा अनुभव आहे. स्वतंत्र भारताच्या आसमंतात स्वयंतेजाने तळपणारा तो एक ध्रुवतारा आहे. आजही लक्षावधी लोक नेताजींची अमोघ वाणी व वक्तृत्व यांनी भारलेले आहेत. शंभर वर्षांपेक्षा जास्त काळ उलटून गेला तरी लोकांना नेताजींच्या जीवन चरित्राबद्दल अत्यंत कुतूहल आहे. नेताजी म्हणजे शूरातील शूर असे नरशार्दूल होते. ठरलेल्या उद्दिष्टांपासून क्षणभरही त्यांची चलबिचल झाली नाही. आपले ध्येय व लक्ष गाठण्यापासून त्यांनी कोणत्याही तडजोडी स्वीकारल्या नाहीत. स्वातंत्र्यदेवीच्या यज्ञवेदीवर आपले बलिदान देऊन ते अमर झाले.''

हा उतारा आहे विठ्ठलराय भट (आंबटकर कंपाऊंड, आंबिवली-प., पो. मोहने, जि. ठाणे - ४२१२०२. भ्रमणध्वनी - ९२२१३०९७५८, ९२२३३६५१९९, यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'नेताजी सुभाषचंद्र बोस' या पुस्तकातील निवेदनातील आहे. श्री. अरविंद पाटकर यांच्या 'मनोविकास' प्रकाशनाने (फ्लॅट नं. ३ ए, चौथा मजला, शक्ती टॉवर्स, ६७२ नारायण पेठ, लोखंडे तालमीजवळ, पुणे-४११०३७, दूरध्वनी ०२०-६५२६२९५० पृष्ठे ११२ असून मूल्य रु. १००/- आहे.) १४.२.१३ रोजी प्रकाशित केले आहे.

**लहानपणापासून धडाडीचे व करारी वृत्तीचे सुभाष**

२० छोट्या छोट्या प्रकरणांतून नेताजीबद्दलची उद्बोधक माहिती त्यांतून दिलेली आहे. लहानपणापासून ते धडाडीचे व करारी व वृत्तीचे होते. १९११ सालच्या डिसेंबर महिन्यांत पंचम जॉर्ज व त्यांच्या पत्नीच्या सन्मानार्थ दिल्लीला भव्य दरबार भरवला गेला होता. वडील जानकीनाथ यांनी सुभाषना दिल्लीस नेले होते. त्यावेळेस अनेक हिंदी संस्थानिक आपल्या चेहऱ्यावर लाचारीचा भाव आणून सम्राटाच्या पायावर लोळण घेत होते. बाल सुभाषच्या मनात तिटकारा उत्पन्न झाला. सारेजण पंचम जॉर्जशी हस्तांदोलन करीत होते. पण सुभाष ताठ मानेने उभा राहिला. त्यानं पंचम जॉर्जशी हस्तांदोलन केले नाही. एकदा जानकीनाथ सुभाषच्या खोलीत काहीतरी शोधण्याच्या निमित्ताने गेले होते. पुस्तकाच्या कपाटात पोस्टरसारखे काही कागद लपवून ठेवल्यासारखे दिसले. त्या पोस्टरवरील मजकूर वाचून जानकीनाथांना क्षणभर चक्कर आल्यासारखे वाटू लागले. पोस्टरमध्ये लिहिले होते- पाहिजेत- हिंदुस्थानात लष्करी बंड घडवून आणण्यासाठी जवाँमर्द शिपाई. पगार-मृत्यू. बक्षीस हुतात्मा. निवृत्ती वेतन-आझादी-रणांगण-हिंदुस्थान.

अशी रोमहर्षक माहिती भरपूर असल्यामुळे पुस्तक वाचनीय झाले आहे.

**मर्दानी झासीवाली**

दुसरे पुस्तक आहे–मर्दानी झासीवाली' (पृ.९२ मुल्य ८०/–) सुरवातीलाच कविवर्य भा. रा. तांबे यांची झासीवालीचा गौरव करणारी तेजस्वी कविता दिलेली आहे–

कडकडा कडाडे बिजली
शत्रूंची लष्करे थिजली
मग किर्तीरुपे उरली
ती पराक्रमाची ज्योत...''झाशीवाली''...

साऱ्या भारतवर्षात राणी लक्ष्मीबाई आपल्या पराक्रमाने तेजाळून गेली. 'गुणिजन जिथे गुणगान तिथे' अशा अर्थाचे एक संस्कृत सुभाषित आहे. या न्यायाने भारतातील सर्व भाषांतून झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचे गुणगान करणारी कथने, काव्ये, पोवाडे, खंडकाव्ये, चरित्रे, कादंबऱ्या, नाटके. इ. अगणित अशी साहित्यसंपदा प्रसिद्ध झाली. त्यांत अूनही भर पडत आहेतच. प्रख्यात हिंदी कवयित्री सुभद्राकुमारी चौहान यांचे खंडकाव्य. श्री. कल्याणसिंह कुडरा यांचे 'लक्ष्मीबाई रासो' हे बुंदेलखंडी भाषेत लिहिलेले काव्य अजरामर आहे. आजच्या राज्यकर्त्यांनी त्याच्यापासून जरूर धडा घ्यावा असे ते आहे. राणीचे सारे जीवनच रामहर्षक घटनांनी भरलेले आहे. मर्दानी झाशीवाली राणी लक्ष्मीबाईचे नाव इतिहासात सुवर्णक्षरात लिहिले गेले आहे. प्रत्येकाने या स्फूर्तिदेवतेचे हे चरित्र अवश्य वाचावे.

**राजयोगिनी अहिल्याबाई होळकर**

या ८८ पृष्ठांच्या (मूल्य रु. ८०/–) चरित्राच्या मनोगतात लेखक म्हणतो,''अहिल्याबाईंच्या जीवनात एकामागून एक असे दुःखाचे अनेक प्रसंग सातत्याने येत होते. त्यांचे सर्व जीवन दुःखमय झालेले. 'दुःख कोणाला सांगावे, दुःख देवाला सांगावे अशी त्यांची परिस्थिती होती. अहिल्याबाईंनी आपले प्रेम, वात्सल्य, माया, ममता आपल्या प्रजेला दिल्या. राज्यात शांतता व सुखसोयी निर्माण करुन प्रजेकरिता अनेकानेक कल्याणकारी कामे केली. दूरदर्शी अहिल्याबाईंनी राष्ट्रीय एकात्मता साधून अखंड भारत निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

''आपल्या प्रत्येक कृतीने आपण ईश्वराचे उत्तरदायित्व मानतो, अशी अहिल्याबाईंची ठाम समजूत होती. ईश्वराने माझ्यावर जे उत्तदायित्व सोपवलेले आहे, ते पार पाडणे हे माझ्या प्रत्येक कृत्याची जबाबदारी माझ्यावर आहे. आज सत्ता व बळाच्या जोरावर मी जे कार्य करीत आहे त्याचा मला परमेश्वरापुढे आखिरी जाब द्यावा लागेल.

अहिल्याबाईंचे हे विचार अत्यंत माननीय आहेत. शाहीर प्रभाकर यांनी अहिल्याबाईंची स्तुती त्यांच्या एका कवनातून गायली आहे ती अशी :–

सती धन्य धन्य कलियुगी अहिल्याबाई।
गेली कीर्ती करुनिया भूमंडळाचे ठाई।।
वर्णिती किर्ती गातात संत जे गाणी।
झाली दैववशे ती होळकरांची राणी।।

असे आहे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांचे हृदयस्पर्शी चरित्र लेखकाने आपल्या सुंदर शब्दांत ते चितारले आहे. कवी खुशालीराम हे अहिल्याबाईंच्या दरबारात होते. त्यांनी 'अहिल्या कामधेनू' हे उत्कृष्ट खंड काव्य संस्कृतमध्ये लिहिले ते स्कॉटलंडची कवयित्री जोना बोली हिने अहिल्याबाईवर १८४९ साली एक काव्य लिहिले त्यात ती म्हणते–

For Thirty years of her reign of peace,
The Land of blessings did increase,
And She was blessed by every tounque,
By Stern and gentle, old and young.

माणसाला 'मी'पणाच्या अहंगडाने पछाडले आहे.

अहिल्याबाईंचे हे हृद्य चरित्र प्रत्येकाने अभ्यासावे. ही दोन्ही पुस्तकेही मनोरमानेच प्रसिद्ध केलेली आहेत.

**निसर्गाच नयनरम्य लेणे कारवार**

मुक्तांगण प्रकाशनाने (राजू भानारकर, ८८०, शुक्रवार पेठ, पंचमुखी मारुतीसमोर, पुणे -४११००२. भ्रमणध्वनी -९३७०१६८८९९) हे पुस्तक (पृ.१०४, मूल्य रु.१००/-) नुकतेच प्रकाशित केले आहे. राजेश (किरण) दिवेकर हे विठ्ठलराय भटांबरोबर सहलेखक आहेत.

कारवार जिल्हा हा पूर्वी 'बाँबे प्रेसिडेन्सी'मध्ये धारवाड, बेळगाव व विजापूर या तीन जिल्ह्यांसह 'बाँबेकर्नाटक' म्हणून ओळखला जात होता. भाषावार प्रांत रचनेच्यावेळी 'बाँबे रेसिडेन्सीतून' गुजरात व महाराष्ट्र अशी दोन वेगळी राज्ये निर्माण करण्यात आली व बाँबे कर्नाटकातील चार जिल्हे हे कर्नाटक राज्यात समाविष्ट करण्यात आले. नोकरी धंद्यानिमित्ता कारवारी माणूस मुंबईत स्थायिक व मग जगभर पसरला असे असले तरी कारवारी माणूस आपली जन्मभूमी, मायभाषा कोकणी व संस्कार विसरत नाही. त्याची नाळ कारवारशी घट्ट जुळलेली आहे. नव्या पिढीला कारवारची व कोंकणीची तेवढीशी माहिती नाही. त्यांना आपल्या भूमीबाबत जबरदस्त कुतूहल आहे. म्हणून अनेकांच्या आग्रहास्तव लेखकद्वयांनी या पुस्तकाची निर्मिती केलेली आहे.

या पुस्तकातील २१ प्रकरणांतून कारवारचा निसर्ग व कला कारवारची प्रेक्षणीय स्थळे, कारवारचा लोकवेद, देवालये व कारवारच्या काही स्पेशल रेसिपीज आणि निवडक कारवारी म्हणी इ. मनोरंजक माहिती देण्यात आलेली आहे. पु. ल. देशपांडे, रविंद्र पिंगे, सौ. उषा उल्हास राणे, डॉ. पी. आर. प्रभुदेसाई, सिंधू प्रभुदेसाई इ. च्या मराठी-इंग्रजीतील लेखांतून ती दिलेली आहे. कारवारच्या निसर्ग सौंदर्याचे दोन चार सुंदर फोटोही पुस्तकात छापले आहेत. मुखपृष्ठ व मलपृष्ठावरही निसर्ग सौंदर्याचे झकास फोटो छापलेले आहेत. कारवारी मंडळींना हे पुस्तक खूप आवडेल.

**सव्यसाची लेखक विठ्ठलराय भट**

विठ्ठलराय भट हे बहु-प्रसवा लेखक आहेत. त्यांना सात आठ भाषा येतात. त्यांनी मराठी-इंग्रजीमध्ये एकूण शंभर पुस्तके लिहिली आहेत. शिवाय १५/२० पुस्तकांची हस्तलिखिते प्रकाशकांकडे पडून आहेत. क्रांतिकारक, देशभक्त, ज्ञानपीठ विजेते लेखक, इतर भारतीय लेखक वाकप्रचार-म्हणी इ. विषयांवरील त्यांची सुंदर पुस्तके शालेय विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहेत. त्यांचे व प्रकाशकांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**मनोविकास प्रकाशन**

या प्रकाशन संस्थने उत्तम दर्जाची अनेक पुस्तके प्रकाशित केलेली आहेत. त्यामध्ये 'मुसाफिर' व 'मनात' (अच्युत गोडबोले) 'पोस्टमार्टेम' (डॉ. रवी बापट व सुनीति जैन), 'ताई, मी कलेक्टर व्हयनू' (राजेश पाटील) 'मी हिजडा, मी लक्ष्मी' (लक्ष्मीनारायण त्रिपाठी) इ. अनेक आहेत. त्यांच्या काही पुस्तकांना महाराष्ट्र राज्याची पारितोषिकेही मिळाली आहेत. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**एक अप्रतिम पुस्तक 'वाचणाऱ्याची रोजनिशीं' - लेखक-सतीश काळसेकर**

नुकताच महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळालेले एक अप्रतिम पुस्तक म्हणजे सतीश काळसेकर (कबीरा चित्रकुटीर कलाग्राम, पो. आंबेघर, ता. पेण, जि. रायगड-४०२१०७, दूरध्वनी -०२१४३-६९२३०४, मो.:९४२२६ ८९५५९), पृ. २९२, मूल्य २५०/- प्रका. लोकवाङ्मय गृह, भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ (फोन नं.०२२-२४३६२४७४)

---

अहंकाराचा वारा आयुष्यातून गेला की मनाचे आकाश निरभ्र होते.

**श्रेष्ठ दर्जाचे पुस्तक**

पुस्तकाचा दर्जा अतिशय श्रेष्ठ आहे. प्रत्येक वाचनप्रेमी व्यक्तीने ते वाचलेच पाहिजे आणि म्हणूनच पुस्तकाचा हा थोडासा विस्तृत परिचय – सतीश काळसेकर यांचे मनोगत–'सुंदर लेखन ग्रंथरूप घेताना आणि उत्तम प्रस्तावना' (दुसऱ्याची रोजनिशी उघडपणे वाचताना – ले. अरुण खोपकर) मधील सारेच लेखन अत्यंत महत्वाचे आहे. म्हणून त्यांतील! निवडक भाग पुढे देत आहेः–

सतीश काळसेकर लिहितात...काही चांगले वाचनात आले, काही चांगले पाहता आले, काही चांगले ऐकता आले की हे कोणाशी बोलावे आणि तो आनंद वाटून घ्यावा असे नेहमीच वाटायचे. रात्री–अपरात्री मित्रांना अवेळी उठवून त्यांना दूरध्वनीवरून अनेकदा ताप दिला आहे. प्रथम 'आपले वाङ्मयवृत्त' व नंतर साप्ता.'साधना' यांच्या माध्यमातून अधिकापर्यंत पोचता आले म्हणून या दोन्ही नियतकालिकांच्या संपादक सहकाऱ्यांचा मी ऋणी आहे. त्याही आधी 'वृत्तमानस'च्या माध्यमातून काही लेखन झाले!

वाचणाऱ्याची रोजनिशी आता आपणासमोर ग्रंथरूपाने येत आहे. अनेकांनी पत्रांनी व भेटीतही सुचविले. श्रेष्ठ संपादक श्री. पु. भागवतांनी तर पुढे जाऊन मौज प्रकाशना तर्फे – लोकवाङ्मय गृहास काही कारणाने जमत नसेल तर हे लेखन ग्रंथरुपाने प्रकाशित करण्याची तयारी दाखविली. लोकवाङ्मय गृहाची काहीच ना नव्हती.

'एशियाटिक लायब्ररी, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय लोकमान्य सेवा संघाचे (विलेपार्ले) ग्रंथालय स्टॅन्ड बुक स्टॉल आणि शानभाग, न्यू ॲन्ड सेकंड हॅन्ड बुक स्टॉल, पीपल्स बुक हाऊस, बॉम्बे बुक डेपो या आणि अशा असंख्य ग्रंथविक्री घरांनी, ग्रंथालयांनी एकांड्या ग्रंथसंग्राहक विक्रेत्यांनी आणि तेही केवळ मुंबईतल्या नव्हे तर देशातल्या या साऱ्यांनी माझा ग्रंथसंग्रह आणि त्यासोबत माझे ग्रंथवाचनही खूप श्रीमंत केला आहे. असंख्य मित्रांचाही हा ग्रंथ साकारण्यात मोठा सहभाग आहे.'

मराठी साहित्याचा भूगोल गेल्या पन्नास वर्षात लक्षणीयरित्या बदलताना दिसत आहे. साहित्याच्या कक्षा आता केंद्राकडून सरकत परिघाच्या विशाल अवकाशात विस्तारताना दिसत आहेत. भाषेची आणि भाषेतून व्यक्त होणाऱ्या साहित्याची त्या आधीची विशुद्धता आणि संपृक्तता पातळ होताना दिसत आहे. या घटनेचे स्वागत करावे की अवहेलना हा राजकीय वाद–विवादाचाच मुद्दा आहे. माझ्यासाठी मात्र हे स्वागतार्हच आहेत. त्यातूनच निर्माण होणारे साहित्य शास्त्रीय चर्चेचे धोके पत्करूनही हे घडत असतानाही साहित्य–व्यवहारावरचा दाब मात्र आजही केंद्रस्थानाशीच निगडित आहे. माझी भूमिका, बांधीलकी परिवाराशी विस्तारत जाणाऱ्या बोलीभाषांचा वापर करणाऱ्या मानवी समूहाशी आहे आणि ती तशी असल्याने मी त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी प्रयत्नशील आहे.

अरुण खोपकर म्हणतात, 'लेखकाची बहुश्रुतता विविध प्रकारचे वाचन अनेक संस्कृतीविषयी, अनेक विषयाविषयी कुतूहल, अनेक वाङ्मय प्रकारांचे प्रेम, सखोल सामाजिक जाणीव आणि मनापासूनची कळकळ ह्या गोष्टी प्रशंसनीय आहेत. त्यांचे वाचन हे त्यांच्या आत्मचरित्राचा एक अविभाज्य भाग आहे. त्यामुळे त्या विषयी ते लिहू लागले की त्यांत त्यांचे मित्र येतात. कळसेकरांच्या वाङ्मयीन आवडी निवडी येतात; मूल्ये येतात त्यांची सामाजिक जाणीव येते, राग लोभ येतात, उत्साह येतो...'

'काळसेकरांची नजर मराठी साहित्यापुरती सीमित न राहता हिंदीकडे वळते. भारतात हे अत्यंत आवश्यक आहे. आम्हांला युरोपात काय चालले आहे याची बातमी असते. हे काही वाईट नाही, उलट चांगलेच आहे. पण

शेजारच्या भाषांत काय चालले आहे हे माहीत नसते. ही खेदाची गोष्ट आहे. ''अस्मिता जरूर असावी, पण ती अज्ञानावर आधारित नसावी. संग्राहक वृत्तीबरोबर, जिज्ञासूपणाबरोबर आणि भाषिक संस्कृतीच्या परस्पर आदराबरोबर जी अस्मिता निगडित असते ती खरी अस्मिता. बाकी निव्वळ स्वार्थी, गल्लाभरू राजकारण' काळसेकरांच्या उदार वाङ्मयीन दृष्टीचा परिणाम म्हणजे साहित्याची एक प्रवाही जाणीव. कलेत ही प्रवाही जाणीव अत्यावश्यक आहे. तिच्यातून कलेच्या नव्या वाटा फुटतात. काळसेकरांच्या रोजनिशीत साहित्य म्हटले की त्यांत वृत्तपत्रे येतात, नियतकालिके येतात. अनियतकालिके येतात, विशाल ग्रंथराज येतात, कितीतरी विविध प्रकारचे लेखन येते. लोकभाषा आणि प्रमाण भाषा ह्याविषयी चर्चा होते. समाजातले आणि तळागाळापासूनचे अनेक स्तर येतात. लोकभाषेवरच्या त्यांच्या प्रेमात लोकांवरचे प्रेम दिसून येते.

**पुस्तकाचे अंतरंग**

डिसेंबर २००३ ते जानेवारी २००९ या शीर्षकांतून त्यांचे वाचन, त्यांना भेटलेली विविध क्षेत्रातील माणसे, विविध पुस्तकांच्या आठवणी, साहित्यातले विविध प्रकार त्या संबंधीचे किस्से इ. मनोवेधक माहितीचा खजिना ६० प्रकरणांतून खचाखच भरलेला आहे. साधारणपणे वयाच्या ९/१० वर्षापासून त्यांना वाचनाचे वेड सुरू झाले ते आजतागायत वर्धिष्णु पद्धतीने वाढतच गेले म्हणूनच पहिल्या प्रकरणाच्या अखेरीस ते म्हणतात,' वाचन हे असे माझ्या पाचवीला पूजल्यासारखे झाले आहे. तिसऱ्या प्रकरणात ते म्हणतात, 'माणसांना समजून घेण्यासाठी आयुष्यात माणसांना' वाचता येणे आवश्यकच. पण शेवटी आपल्याला काळाच्या इतिहासाच्या भूगोलच्या समाजाच्या आणि आपल्या लहानशा व्यक्तिगत आयुष्याच्या सीमा वाचनाने पार करता येतात. मागला काळ असाचा काळ त्यातून भविष्याचा विचार, आपला समाज आणि जगाच्या पाठीवरचे अन्य समाज, संस्कृती-संस्कृतीतले भेदाभेद, माणसामाणसांतले माणूसपण आणि माणसांतले हजारो अंतर्विरोध, मानवेतर विश्व आणि त्यांचे व्यापार हे सगळे समजून घेण्यासाठी ग्रंथ मदत करतात. त्यांतून ओळखीच्या जगाची जशी नवी ओळख होण्याची शक्यता वाढते तशी अनोळखी जग काही प्रमाणात का होईना ओळखीचे होण्याचीही शक्यता वाढते. मी या सगळ्या कारणांसाठी वाचनाकडे वळलो.

अनेक नियतकालिके, अनेक पुस्तके, अनेक प्रकारचे लेखक-वाचक इ. ची विविध माहिती थक्क करणारी आहे. त्यातील अगदी महत्त्वाची माहिती सांगावयाची म्हटले तरी दुसरे पुस्तक तयार होईल. तेव्हा हात आखडता घेणे आवश्यक आहे. तरीही जाताजाता या ६० प्रकरणांव्यतिरिक्त शेवटी 'पुस्तकांविषयीची पुस्तके' या शीर्षकाखालील थोडासा मजकूर पुढे उधृत करतो.

वाचणाऱ्याची रोजनिशी हे पुस्तकांविषयीची पुस्तके या सदरात मांडणारे पुस्तक आहे. या प्रकारच्या पुस्तकांचे प्रमाण इंग्रजी भाषेत फार मोठे आहे. लेखक, प्रकाशक, पुस्तकविक्रेते, वाचक अशा अनेक नात्यांनी पुस्तकांशी प्रेमाचे त्यांतून ही पुस्तके जन्म घेतात. पुस्तक वेड्यांच्या पुस्तक संग्रहात अशा प्रकारच्या पुस्तकांना फार महत्त्वाचे स्थान आहे. पुस्तकांविषयीच्या पुस्तकामध्ये विषयाचे वैविध्य भरपूर आढळते. पुस्तके जमविण्याचे नानाविध मार्ग व ठिकाणे, पुस्तकांची जपणूक करण्यासाठी करावी लागणारी यातायात, वाचनाच्या चित्रवचित्र सवयी वाचनाचा जीवनावर पडलेला प्रभा व अशा कितीतरी विषयांवर पुस्तके लिहिली जातात. 'पुस्तके आणि त्यांचे वाचन हा विषय केंद्रस्थानी ठेवून लेखक, प्रकाशक, पुस्तक विक्रते किंवा निव्वळ वाचक यांनी आत्मचरित्रे लिहिली आहेत आणि याविषयीभोवती गुंफलेल्या कादंबऱ्याही प्रकाशित झालेल्या आहेत. केवळ पुस्तकांविषयीची

पुस्तके विकणारी व प्रकाशित करणारी ही संस्थादेखील अस्तित्वात आहेत. वाचन संस्कृतीची जोपासना आणि वाढ होण्यासाठी पुस्तकांविषयीची पुस्तके मोठा हातभार लावत असतात..'

पुस्तकाच्या शेवटी अशा पुस्तकांची यादी दिलेली आहे त्यांत मराठी २६ व इंग्रजीतील ४६ पुस्तके आहेत. ही यादी परिपूर्ण म्हणता येणार नाही. पण जिज्ञासूंनी / अभ्यासकांनी ती जरूर वाचावीत. (इंग्रजीतील 'पॅशन फॉर बुक्स-संकलन रॉबिनॉ विटझ हॅरॉल्ड अॅन्ड कपलान रॉब) या पुस्तकाच्या अखेरीस ११३ पुस्तकांच्या नावांची यादी दिलेली आहे असे खुद्द काळसेकरांनीच शेवटी म्हटले आहे.


**सोन्याचे मोल असलेला ग्रंथ**

सोन्याचे मोल लाभलेला असा हा ग्रंथराज आहे. भारताच्या प्रत्येक भाषेतून त्याचा अनुवाद व्हावा असे आग्रहाने वाटते. मराठी साहित्यात मोलाची भर घातल्याबद्दल लेखक सतीश काळसेकर, प्रकाशक लोकवाङ्मय गृह आणि लेखननिर्मितीत सहाय्य करणारे असंख्य सहकारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**

५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●



## टोकयंत्र

पूर्वी चाकूने पेन्सिलीला टोक केले जायचे. अर्थातच लहान मुले बऱ्याच वेळा बोट कापून घ्यायचे. फ्रेंच गणिततज्ज्ञ बर्नार्ड लॅस्सीमोर यांना १८२८ मध्ये टोकयंत्राची कल्पना सुचली आणि त्यांनी पेटंटही घेतले. पण अशा सुरक्षित टोकयंत्राचे उत्पादन करणे मात्र त्यांना जमले नाही. १८९७ मध्ये मात्र अमेरिकेच्या जॉन ली ल्व्ह यांनी टोकयंत्राचे पेटंट घेऊन उत्पादन सुरू केले. पाते बसवलेल्या छोट्या डबीत पेन्सिल गोलाकार फिरवून टोक केले जायचे. अशी टोकयंत्रे अजूनही प्रचलित आहेत. १९१७ सालापासून इलेक्ट्रिक टोकयंत्रे आली. अमेरिकेतील शाळांमध्ये अशी मोठी टोकयंत्रे बसवलेली असतात आणि एकाच वेळी अनेक विद्यार्थी आपल्या पेन्सिलींना टोक करुन घेतात.

## टेपरेकॉर्डर

अमेरिकेच्या ओबेरेलिन स्मिथ यांना १८७८ मध्ये टेपरेकॉर्डरची संकल्पना सुचली होती; पण ती मूर्त स्वरुपात आली नाही. डॅनिश शास्त्रज्ञ व्हॅल्डेमार पोल्सन यांना टेपरेकॉर्डरचे जनक मानले जाते. कारण १८९८ मध्ये त्यांनी असे यंत्र तयार केले. त्याला टेलिग्राफोन म्हटले जायचे. कारण त्यावर टेलिफोनवरील संभाषण मुद्रित करता यायचे. ध्वनिमुद्रण करण्यासाठी त्यांनी आयर्न ऑक्साईड पावडरचे कोटिंग केलेल्या कागदी पट्ट्या वापरल्या. जर्मनीतील फ्रिट्झ फ्लयूमर यांनी १९२८ मध्ये प्लॅस्टिकवर मॅग्नेटिक कोटिंग असलेल्या टेपचा शोध लावला. १९६२ मध्ये कॉम्पॅक्ट कॅसेट आल्या, तर १९७८ मध्ये डिजिटल टेपरेकॉर्डर.

**- संग्रहातून**

## काही भारतीय शास्त्रज्ञ

*भारतीय व जागतिक शास्त्रज्ञांचे जीवन जाणून घेतले तर त्यांची चिकाटी, दूरदृष्टी याची कल्पना येते. निदान अशा काही शास्त्रज्ञांच्या जन्म मृत्याची वर्षे एकत्रित मिळावी म्हणून हा तक्ता*

| अनु. क्र. | शास्त्रज्ञ | जन्म | मृत्यू | काही महत्त्वाची पुस्तके |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. सलीम अली | १२ नोव्हे. १८९६ | १२ मार्च १९७८ | १. द बुक ऑफ इंडियन बर्डस<br>२. द फॉल ऑफ द स्पॅरो |
| २. | पांडुरंग सदाशिव खानखोजे | ७ नोव्हें. १८८४ | १८ जाने. १८६७ | |
| ३. | डॉ. वसंत रामजी खानोलकर | १३ एप्रिल १८८५ | २९ ऑक्टो. १८७८ | १. अ लूक ॲट अ कॅंसर |
| ४. | डॉ. हरगोविंद खुराना | ८ जाने. १९२२ | | |
| ५. | डॉ. अब्दुल कलाम | १५ ऑक्टो. १९३१ | – | १. इंडिया २०२०<br>२. विंग्ज ऑफ फायर |
| ६. | प्रा. त्रिभुवनदास गज्जर | ऑगस्ट १८६३ | १४ जून १९२० | |
| ७. | डॉ. एच. चंद्रशेखर | १९ ऑक्टो.१९२० | २१ ऑगस्ट १८९५ | |
| ८. | डॉ. जे. जे. चिनॉय | १८ फेब्रु. १९०९ | १२ मार्च १९७८ | |
| ९. | डॉ. जयंत नारळीकर | १८ जुलै १९३८ | | १. आकाशाशी जडले नाते<br>२. यक्षांची देणगी व इतर |
| १०. | सर जगदीशचंद्र बोस | ३० नोव्हें. १८५८ | २३ नोव्हें. १९३७ | १. सजीव व निर्जीव यांतील प्रतिसाद प्रक्रिया (१९०२)<br>२. वनस्पतीतील चेता यंत्रणा (१९२६) |
| ११. | प्रा. सत्येंद्रनाथ बोस | १ जाने. १८९४ | ४ फेब्रु. १९७४ | |
| १२. | डॉ. विजय भटकर | ११ ऑक्टो. १९४६ | – | |

समोर अंधार दिसत असला तरी त्या पलीकडे उजेड आहे हे लक्षात ठेवा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३. | डॉ. शांतिस्वरूप भटनागर | २१ फेब्रु. १८९४ | १ जाने. १९५५ | |
| १४. | डॉ. होमी भाभा | ३० ऑक्टो. १९०९ | २५ जाने. १९६६ | |
| १५. | डॉ. रघुनाथ अनंत माशेलकर | १ जाने. १९४३ | | |
| १६. | सर सी. व्ही. रामन | ७ नोव्हें. १८८८ | २१ नोव्हें. १९७० | |
| १७. | प्रा. आर. के. रामनाथन | २८ फेब्रु. १८९३ | १९९५ | |
| १८. | श्रीनिवास रामानुजन | २ डिसें. १८८७ | २६ एप्रिल १९२० | १. रामानुजन्स नोटबुक्स ३ खंड |
| १९. | प्रो. यू. आर. राव | १० मार्च १८३२ | | |
| २०. | आचार्य डॉ. प्रफुल्लचंद्र रे | २ ऑग. १८६१ | १४ जून १९४४ | १. इंडियन केमिकल हिस्टरी – १९०२ |
| २१. | डॉ. डी. एन. वाडिया | २५ ऑक्टो. १८८३ | १५ ऑक्टो. १९६७ | १. नंगा पर्वत आणि गिलगिट जिल्ह्यातील भूविज्ञान<br>२. हिमालयाची संरचना<br>३. दी जीऑलॉजी ऑफ इंडिया अँड बर्मा |
| २२. | सरविश्वेश्वरय्या | १५ सप्टें १८६१ | १४ जून १९४४ | १. द रिंकस्ट्रक्टींग इंडिया १९२०<br>२. प्लन्ड इकॉनॉमी फॉर इंडिया १९३४<br>३. प्रॉस्पॅरिटी थ्रू इंडस्ट्री १९६७<br>४. मेमरीज ऑफ माय वर्किंग लाइफ १९६० |
| २३. | डॉ. वेणू बाप्पू | ९ ऑगस्ट १९२७ | ९ ऑग. १८८२ | |
| २४. | डॉ. विक्रम साराभाई | १२ ऑग. १९१९ | ३० डिसें. १९७१ | |
| २५. | डॉ. मेघनाद साह | ६ ऑक्टो. १८९३ | १६ फेब्रु. १९५६ | |

**– संकलित**

ज्यांना यश मिळालेले नाही त्यांनाच यशाचे महत्त्व समजलेले असते.

# परिसर वार्ता

**– संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक शाळा

### मुलांबरोबर काही क्षण (भाग – १)

एप्रिल महिना जसा जवळ येतो, तसे परीक्षांचे आणि उन्हाळ्याचे दिवस सुरू होतात. एप्रिलच्या ८–१० पर्यंत परीक्षा संपतात. मुलं मोठ्ठी सुटट्री म्हणून आनंदाने घरी जातात. मग शाळेत रहातात ते शिक्षक, निकालाचे काम आणि पुढील वर्षाची आखणी. मुलांशिवाय शाळा अगदी शांत वाटते. मुलांच्या आठवणी, काही प्रसंग आठवू लागतात आणि कामात थोडासा विरंगुळा तसेच आनंद देऊन जातो. अशाच काही आठवणी मी या लेखातून तुम्हांला सांगणार आहे.

- पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांना आम्ही 'पाणी' हा प्रकल्प घेतो. त्या संबंधीची माहिती प्रयोग त्यांना सांगितले, दाखवले जातात. या संबंधात मुलांना विचारले, आपल्याला पाणी कोठून मिळते? पाऊस, नळ, नदी वगैरे झाल्यानंतर एक मुलगा उठून म्हणाला, 'दुकानातून'. मी आश्चर्याने त्याला विचारले 'काय?' त्यावर मला म्हणाला, टिचर काल आम्ही फिरायला गेलो होतो आणि खूप तहान लागली म्हणून बाबांनी दुकानातून पाण्याची बाटली आणली. हे ऐकल्यावर मात्र त्याचं उत्तर त्याच्या निरीक्षणातून आलेलं आहे हे प्रकर्षाने जाणवलं.
- मुलांना चित्र असलेल्या काही पटट्या (Strips) दाखवल्या जातात. त्यांतील वेगळे म्हणजे गटात नसणारे चित्र त्यांनी ओळखायचे व ते वेगळे कसे याचे कारण सांगायचे. याचा सराव दिला जातो. यामुळे मुलांना विचार करून त्यामागचे कारण स्पष्टपणे मांडण्याची सवय लागावी असा उद्देश असतो.

१. एका चित्रपट्टीत चार फळांची चित्रे होती – केळं, आंबा, फणस, कलिंगड

मला आंबा हे उत्तर अपेक्षित होतं कारण त्यात एक बी, इतर फळांमध्ये अनेक बिया असतात.

एक मुलगा म्हणाला, 'फणस वेगळा आहे' मी म्हटले, कसा रे? अगं टिचर, माझी आजी फणसाची भाजी करते, पण इतर कुठल्याच फळाची भाजी करत नाही.

२. दुसऱ्या चित्रपट्टीत चार खेळणी होती. त्यांपैकी एक विजेवर चालणारे तर इतर साधे होते. अर्थात विजेवर चालणारे खेळणे वेगळे ह्याच उत्तराची अपेक्षा शिक्षिकेने केली. एक मुलगी म्हणाली, '' त्या चित्रपट्टीतील तीन चाकी सायकल वेगळी आहे, कारण इतर तीन खेळ माझ्याकडे आहेत, पण सायकल नाही म्हणून ती वेगळी.

मुलं कसा विचार करतात ते बघितलं. प्रौढ व्यक्ती या पद्धतीने विचारच नाही करू शकत. कारण आपली मतं ठाम / पक्की झालेली असतात.

- मुलांचे बोटांचे स्नायू विकसित होण्यासाठी त्यांना काही वस्तू / कृती हाताळण्यास दिला जातात. रोजच्या उपयोगातील पांढरी रांगोळी व पाटी असे देऊन त्याबरोबर खेळण्यास वेळ दिला जातो. हे सर्व मुलांना दिले व शिक्षिकेने सांगितले, तुम्हांला सुचेल ते व तसे खेळा. एक मुलगा त्या पाटीवर रांगोळीने डोंगर करत होता. शिक्षिका त्याला म्हणाली, अरे, वाळूत डोंगर करायचा. रांगोळीने काहीतरी आकृती / चित्र काढायचा प्रयत्न कर ना.

एक मिनिट विचार करुन हा मुलगा म्हणतो कसा– आता म्हणालात ना टिचर तुम्हांला हवे ते आणि हवे तसे खेळा. मग मला डोंगर करायचा आहे. मग करू द्या ना! चित्र काढ का म्हणता?

यावर शिक्षिका पूर्णपणे निरुत्तर झाली. आपण सूचना दिली आणि आपणच त्यावर दुसरे भाष्य केले हे त्या चिमुरड्याने शिक्षिकेच्या लक्षात आणून दिले. असे अनेक प्रसंग घडत असतात आणि शिक्षक म्हणून या मुलांबरोबरचा वेळ अगदी आनंदी, खेळकर वातावरणात जातो. मुलांना शिकवताना अनेक गोष्टी आपल्याला नव्याने कळतात.

**सौ. प्रिती कुळकर्णी**
शिक्षिका
पूर्व प्राथमिक विभाग

**NSTSE युनिफाईड कॉन्सिल परीक्षा – २०१३**
**निकाल : १००%**

इ. ५ वी तील यश कोकाणे ह्याने राष्ट्रीय स्तरावर २४७ वा क्रमांक पटकावला.

| इयत्ता | परीक्षेला बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी |
|---|---|---|
| ५वी | १४ | १४ |
| ७ वी | ३ | ३ |
| ९ वी | १ | १ |

**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

**ग्रंथालयात नवीन भरती**

अनुसुचित जातीसाठी असलेल्या ग्रंथालय परिचर पदावर श्री. वामन दादा कारंडे यांची पदोन्नती करण्यात आली. ते दि. १ एप्रिल २०१३ रोजी कामावर रुजू झाले. तसेच श्री. संतोष झुंगरे यांची अनुसुचित जमाती वर्गामधून ग्रंथालय परिचर या पदासाठी निवड करण्यात आली. ते दि. १५ एप्रिल २०१३ रोजी कामावर रुजू झाले.

**सराव परिक्षा**

Semester II, IV, VI च्या विद्यार्थ्यांसाठी दि. १,२,३,४ एप्रिल २०१३ रोजी सराव परीक्षा घेण्यात आली. विद्यार्थ्यांना याचा उपयोग विद्यापीठाची परीक्षा देताना व्हावा हा या मागचा उद्देश होता. प्रत्येक पेपर नंतर विद्यार्थ्यांबरोबर उत्तरास आवश्यक असणाऱ्या बाबींविषयी चर्चा करण्यात आली. तसेच उत्तर कसे लिहावे, त्यात आवश्यक असणारे मुद्दे या बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**प्रात्यक्षिक सराव परीक्षा**

प्रात्यक्षिक परीक्षेत नापास झालेल्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी परत परीक्षा घेण्यात आली. ही परीक्षा ५ एप्रिल आणि ६ एप्रिल २०१३ रोजी घेण्यात आली आणि हिचा निकाल हा ८ एप्रिल २०१३ रोजी लावण्यात आला.

प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार ह्यांनी आपल्या Ph.D संदर्भातील Course Work पूर्ण केला. सत्र Course Work मध्ये सादरीकरण याचा समावेश होता. १०० गुण असलेल्या शोध निबंधाचे शीर्षक

"A Study of the effectiveness of the Remedies under consumer protection Act, 1986- A consumer Rights perspectives."

''ग्राहक संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत उपाय योजनांच्या प्रभावी कार्यक्षमतेचा अभ्यास–ग्राहकाच्या अधिकारांच्या दृष्टीकोनातून''

**विद्यापीठ परीक्षा दूरशिक्षण विभाग**

आमचे महाविद्यालय द्वितीय वर्ष वाणिज्य या

परिक्षेसाठी दि. १ ते ९ एप्रिल २०१३ या कालावधीसाठी परिक्षा केंद्र होते. विधी (LLB) च्या परिक्षा १० एप्रिल पासून सुरू झाली.

**विद्यापीठाचा केंद्रीय तपासणी कार्यक्रम**

विधी परिक्षेच्या केंद्रीय तपासणी कार्यक्रम हा दि. १५.४.२०१३ रोजी पासून चालू झाला. तसेच हा कार्यक्रम मे २०१३ पर्यंत चालू राहण्याची शक्यता आहे.

## विद्या प्रसारक मंडळ

विद्या प्रसारक मंडळाचे माजी अध्यक्ष कै. डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या नवव्या स्मृतीदिनाचा कार्यक्रम रविवार, दिनांक १४ एप्रिल २०१३ रोजी सकाळी १०.३० वाजता संपन्न झाला. या स्मृतिदिनानिमित्त ''कॅलक्युलस चा विकास आणि उगम भारतामध्ये'' या विषयावर प्रा. रामासुब्रमनियन यांचे व्याख्यान झाले. थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास मंडळाचे पदाधिकारी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी वि. प्र. मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर होते. या कार्यक्रमात डॉ. सुधाकर आगरकरांच्या दिशामध्ये आलेल्या चीन संबंधीच्या लेखांच्या 'चीनचे जवळून दर्शन' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

**प्रथम स्मृतिदिन :**
विषय : भारत आणि संगणक **वक्ता :** डॉ. दीपक फाटक

**द्वितीय स्मृतिदिन :**
विषय : जागतिक अर्थकारणात आशियाई वर्चस्वासाठी शिक्षणाचे महत्त्व **वक्ता :** प्रा. वाय. के. भूषण

**तृतीय स्मृतिदिन :**
विषय : जागतिकीकरण आणि भारतीय अर्थकारण – परिणाम आणि दिशा **वक्ता :**डॉ. विष्णू कान्हेरे

**चतुर्थ स्मृतिदिन :**
विषय : भारतीय दर्शनशास्त्रामधील घटितार्थशास्त्र आणि विरचना **वक्ता :** डॉ. आर. बाळसुब्रमनियन

**पाचवा स्मृतिदिन :**
विषय : विज्ञान आणि समाज : वसाहतवादाच्या पार्श्वभूमिवर घ्यायचा बोध **वक्ता :** डॉ. दीपक कुमार

**सहावा स्मृतिदिन :**
विषय : ऐतिहासिक दृष्टीकोनातून भारतीय विज्ञान व धर्म **वक्ता :** प्रा. वी. व्ही. सुब्बारायप्पा

**सातवा स्मृतिदिन :**
विषय : शैक्षणिक उत्तमतेकरिता स्वायत्ततेची गरज? **वक्ता :** प्रा. राम ताकवले

**आठवा स्मृतिदिन :**
विषय : महाराष्ट्राची सांस्कृतिक जडण घडण – पुरातत्वीय पुरावा **वक्ता :** डॉ. म. के. ढवळीकर

**नववा स्मृतिदिन :**
विषयः 'कॅलक्युलस चा विकास आणि उगम भारतामध्ये' **वक्ता :** प्रा. रामासुब्रमनियन

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे**. त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षांचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●


आदिशक्ती असलेल्या स्त्रीचा अपमान ही सर्वात वाईट गोष्ट आहे.

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

## शैक्षणिक संस्थांचा समुह

| अ.क्र. | संस्थेचे नाव | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| १ | डॉ. बेडेकर विद्या मंदिर – मराठी माध्यम शाळा<br>(पूर्वीची रजिस्टर्ड खाजगी मराठी शाळा – १९३४) | १९५८ |
| २ | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय<br>(राष्ट्रीय मुल्यांकन व प्रत्यायन परिषद – NAAC तर्फे पुनर्मुल्यांकित – 'अ' वर्ग) | १९६९ |
| ३ | के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय<br>(राष्ट्रीय मुल्यांकन व प्रत्यायन परिषद – NAAC तर्फे पुनर्मुल्यांकित – 'अ' वर्ग) | १९६९ |
| ४ | विप्रमंचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय<br>(राष्ट्रीय मुल्यांकन व प्रत्यायन परिषद – NAAC तर्फे मुल्यांकित) | १९७२ |
| ५ | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था<br>(पूर्वीची औद्योगिक व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था)<br>ISO 9001 : 2008 (SGS - UK), एआयसीटीई मान्यताप्राप्त | १९७३ |
| ६ | सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा | १९७६ |
| ७ | विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन<br>(राष्ट्रीय मुल्यांकन – NBA तर्फे मुल्यांकित एआयसीटीई मान्यताप्राप्त) | १९८३ |
| ८ | विद्या प्रसारक मंडळाचे प्रगत अध्ययन केंद्र | १९९६ |
| ९ | विप्रमंचे तंत्रनिकेतन – माहिती व तंत्रज्ञान केंद्र | २००० |
| १० | विप्रमंचे परदेशी भाषा अभ्यास केंद्र | २००८ |
| ११ | विप्रमंचे संरक्षण व व्यूहरचना अभ्यास केंद्र | २००८ |
| १२ | विप्रमंची लंडन ॲकेडमी ऑफ एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, लंडन | २००९ |
| १३ | विप्रमंचे आंतरराष्ट्रीय शिक्षण व संशोधन केंद्र | २००९ |
| १४ | विप्रमंचे महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर, जिल्हा रत्नागिरी | २०१२ |
| १५ | विप्रमंची दूरस्थ शिक्षण संस्था | २०१२ |

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006



# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❇ संपर्क ❇

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.